मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
मराठी
# युवक आधार

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २५४ ■ बुधवार, २७ मे २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

## सहीशिवाय जनगणना! उरण पालिकेचा भोंगळ कारभार

### शिक्षकांची जनतेसमोर अब्रू धुळीस”


**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : देशभर ऑनलाईन फसवणुकीचे जाळे दिवसेंदिवस वाढत असताना शासनाने सुरू केलेल्या भारताची जनगणना 2027 मोहिमेत उरण नगरपालिकेचा धक्कादायक आणि बेफिकीर कारभार समोर आला आहे. जनगणनेसाठी नियुक्त करण्यात आलेल्या शिक्षकांना देण्यात आलेली नियुक्तीपत्रे आणि ओळखपत्रे ही अधिकृत सहीशिवायच वाटण्यात आल्याने संतापाची लाट उसळली आहे.प्रगणक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या शिक्षकांना “जनगणना अधिनियम 1948” अंतर्गत कायदेशीर जबाबदाऱ्या सांगणारे नियुक्तीपत्र देण्यात आले. त्यावर उरण नगरपरिषदेचा शिक्का झळकतो; मात्र ज्या मुख्याधिकाऱ्यांची सही असणे बंधनकारक आहे, ती सहीच गायब! त्यामुळे हे पत्र खरे की बनावट? असा प्रश्न जनतेसमोर उभा ठाकला आहे.विशेष म्हणजे मुख्याधिकारी समीर जाधव रजेवर असल्याची माहिती असून प्रभारी अधिकाऱ्यांचा कारभार “येतील तेव्हा” अशा पद्धतीने सुरू असल्याचा आरोप केला जात आहे. नगरपालिकेचे प्रभारी घाडगे यांच्याकडे विचारणा केली असता “असाच अनुभव आम्हालाही येत आहे,” अशी कबुली त्यांनी दिल्याचे समोर आले आहे.याचा सर्वाधिक फटका शिक्षक वर्गाला बसत आहे. उन्हाळ्याच्या सुट्टीत कुटुंबापासून दूर राहून जनगणनेचे काम करणाऱ्या शिक्षकांना आता नागरिकांच्या संशयाचा सामना करावा लागत आहे. अनेक ठिकाणी “हे आयकार्ड खरे आहे का?” असा सवाल करत शिक्षकांना दारातूनच हाकलले जात असल्याचे चित्र आहे. महिला शिक्षिकांनाही अपमानास्पद वागणूक मिळत असल्याने संताप व्यक्त होत आहे. एका बाजूला शासन “जनगणनेद्वारे सार्वजनिक कल्याण”चा नारा देत आहे, तर दुसऱ्या बाजूला अधिकृत सहीशिवाय कागदपत्रे देऊन शिक्षकांना संशयाच्या भोवऱ्यात ढकलले जात आहे. हा निष्काळजीपणा की प्रशासनाचा भोंगळपणा? असा सवाल आता उरणकर विचारू लागले आहेत.जनतेचा विश्वास मिळवायचा असेल तर शासनाने तात्काळ दखल घेऊन अधिकृत सहीसह वैध नियुक्तीपत्रे आणि ओळखपत्रे देण्याची मागणी जोर धरू लागली आहे. अन्यथा “जनगणना”ऐवजी “जनतेचा संताप” मोजण्याची वेळ प्रशासनावर येईल, अशी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

## कातकरी समाजातील लेकीची थेट लंडनला झेप

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** रायगडच्या दुर्गम डोंगरदऱ्यांतून उगवलेलेदैनिक एक स्वप्न आज थेट लंडनच्या विद्यापीठापर्यंत झेपावले आहे. कातकरी समाजातील कु. सपना राजेश वाघमारे हिच्या जिद्दीने आणि शिक्षणाच्या बळावर इतिहास घडवला असून ती रायगड जिल्ह्यातील कातकरी समाजातील पहिली महिला वकील ठरली आहे. आता तिची इंग्लंडमधील नामांकित डेपवेप येथे उच्च शिक्षणासाठी निवड झाल्याने संपूर्ण रायगड जिल्ह्यात अभिमानाची भावना व्यक्त होत आहे.



रोहातालुक्यातीलकोलाडजवळच्या चिंचवली या छोट्याशा गावात अत्यंत साध्या कुटुंबात वाढलेल्या सपनाने संघर्षाच्या कठीण वाटेवरून शिक्षणाचा दीप तेवत ठेवला. वनवासी कल्याण आश्रम शाळा, उत्तेखोल (ता. माणगाव) येथे राहून तिने इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत शिक्षण पूर्ण केले. 2015 मध्ये दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर तिने उच्च शिक्षणासाठी पुण्याकडे मोर्चा वळवला. आर्थिक अडचणी, सामाजिक मर्यादा आणि अनेक संकटांवर मात करत तिने कायद्याचे शिक्षण पूर्ण केले आणि वकिली क्षेत्रात पाऊल ठेवत कातकरी समाजासाठी नवा इतिहास घडवला. आता आदिवासी विकास विभागाच्या ग्लोबल स्कॉलरशिप प्रोग्रॅम अंतर्गत तिची लंडनमधील दोन प्रतिष्ठित विद्यापीठांमध्ये निवड झाल्याने तिच्या संघर्षाला आंतरराष्ट्रीय यशाची जोड मिळाली आहे.

सपना वाघमारेच्या यशामागे तिचे मामा आणि वनवासी कल्याण आश्रमाचे कार्यकर्ते भिवा पवार यांची प्रेरणा महत्त्वाची ठरली. तसेच श्रीमती वैशालीताई हरसुलकर, श्रीनाथ शिंदे, सतीश मोकाशी आणि महेशजी काळे यांच्या मार्गदर्शनामुळे तिचा आत्मविश्वास अधिक दृढ झाला. वनवासी समाजात शिक्षणाची गंगा पोहोचवण्यासाठी वनवासी कल्याण आश्रमाने केलेले कार्य या निमित्ताने पुन्हा अधोरेखित झाले आहे. संघर्ष आणि असंतोषाऐवजी शिक्षण, संस्कार आणि आत्मविश्वासाच्या जोरावर समाज उभा राहू शकतो, याचे जिवंत उदाहरण म्हणजे सपना वाघमारे होय. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा संदेश आजही समाजाला दिशा देत आहे. सपना वाघमारेसारख्या मुली त्या विचारांना आधुनिक काळात नवे बळ देताना दिसत आहेत. आज वनवासी समाजातील अनेक मुली सपनाकडे प्रेरणेने पाहत आहेत.

आम्हीही मोठी स्वप्ने पाहू शकतो, हा आत्मविश्वास त्यांच्या मनात निर्माण झाला आहे.

रायगडच्या मातीतून उगवलेली ही कन्या आता लंडनमध्ये ज्ञानाचा झेंडा फडकवण्यासाठी सज्ज झाली असून तिची ही गगनभरारी संपूर्ण समाजासाठी अभिमानाची आणि आशेची नवी पहाट ठरत आहे.

## खालापूर तालुक्यात गोतस्करी व अवेद्य कत्तल खाण्यावर कारवाईची सौं सुप्रिया साळुंखे यांची मागणी

**दैनिक युवक आधार**

**खालापूर - प्रतिनिधी संतोष शेवाळे** : बकरी ईदच्या पाश्वभूमीवर खालापूर तालुक्यात अवेद्य कत्तलखाणे व गोतस्करी रोखण्यासाठी कठोर कारवाई करण्यात यावी तसेच संवेदनशील भागामध्ये विशेष पोलीस चौक्या उभारण्यात याव्यात अशी मागणी विश्वहिंन्दू परिषद व बजरंग दलाच्या वतीने गोरक्षक समितीने तालुक्यातील प्रथम नागरिक मा. तहसीलदार श्री अभय चव्हाण व खालापूर




पोलीस निरीक्षक श्री सचिन पवार यांना निवेदणाद्वारे मागणी करण्यात आली.हे निवेदन केवळ खालापूर तालुका पुरते मर्यादित नसून संपूर्ण रायगड जिल्ह्यासाठी देण्यात आले असल्याचे पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.बकरी ईद दरम्यान कायदा व सुव्यवस्था आबाधित राखण्यासाठी विशेष तपासणी मोहीम राबविणे, सौंशईत वाहणाची तपासणी करणे, अवेद्य कत्तलखाने व गोतस्करी प्रकरणाकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे अशी मागणी कारण्यात आली. यावेळी सौं सप्रिया ताई साळुंखे, मनीष खवले, राहुल गायकवाड, अजय इंदुलाकर, विश्वहिंदू परिषदेचे जिल्हा मंत्री मोहन पार्टे, गोरक्षा प्रमुख सचिन झुंजारराव, चेतन पटेल, अमित सोनकर, विलास बारस्कार, भावेश लोखंडे, ॲड. रवी रनोत, प्रशांत लटके, महामंडलेश्वर नंदा नंदगिरी महाराज, स्वामी ब्राम्हनणंद बाबा, चॅतन्य महाराज खंडागळे, वामन महाराज भोईर, दत्ता महाराज चाळके, दिलीप महाराज पाटील, रोहित कुलकर्णी, कौस्तुभ देशक, सचिन कुडपाने, संदीप गोसावी, रवींद्र जैन, गणेश मोरे. संतोष मालुसरे, संतोष पाटील, यशवंत नलावडे, संतोष टेमकर, विनीत मोडक, प्रशांत जुबरे, विजय घरत, विभा पाठक, श्रुती चौधरी, राजश्री गोसावी, नीरजला राजपूत, हे सर्व उपस्थित होते.

## पनवेल शहर वाहतूक पोलिसांची तत्परता; अपघातग्रस्त चालकाला दिले जीवदान

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : आसूडगाव येथील इंडियन ऑईल पंपाजवळ 25 मे रोजी झालेल्या भीषण अपघातात वाहन चालकाचा पाय वाहनात अडकल्याने परिस्थिती गंभीर बनली होती. यावेळी पनवेल शहर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील हे आपल्या पथकासह गस्तीवर असताना त्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. अपघाताची तीव्रता लक्षात घेता वाहतूक पोलिसांनी



कोणताही विलंब न करता प्रसंगावधान राखून चालकाला वाहनातून सुखरूप बाहेर काढले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांनी स्वतः मदतकार्यात सहभाग घेतल्याने संबंधित चालकाचे प्राण वाचविण्यात यश आले. पनवेल शहर वाहतूक शाखेच्या या तत्पर आणि संवेदनशील कामगिरीबद्दल नागरिकांकडून कौतुक व्यक्त करण्यात येत असून खाकी वर्दीतील माणुसकीचे पुन्हा एकदा दर्शन घडले आहे. सदर वाहन चालकास पुढील कार्यवाहीसाठी कळंबोली वाहतूक शाखेच्या ताब्यात देण्यात आले आहे.







## श्री सिद्धिविनायक मंदिर परिसर सुशोभीकरण प्रकल्पाचे भूमिपूजन संपन्न



**दैनिक युवक आधार**

**मयूर धुरी(दादर मुंबई ) प्रतिनिधी:** श्री सिद्धिविनायक मंदिर परिसराच्या सुशोभीकरण प्रकल्पाचे भूमिपूजन आज दिनांक २५ मे रोजी मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, मा. उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे, श्री सिद्धिविनायक मंदिर न्यासाचे अध्यक्ष श्री. सदा सरवणकर (राज्यमंत्री दर्जा), मा. महापौर श्रीमती रितू तावडे, मा. उपमहापौर श्री. संजय घाडी तसेच श्री सिद्धिविनायक मंदिर न्यासाचे सर्व विश्वस्त यांच्या हस्ते संपन्न झाले. मुंबईसह देशभरातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री सिद्धिविनायक मंदिराच्या परिसराच्या विकासासाठी हा प्रकल्प महत्त्वपूर्ण मानला जात असून, मंदिर परिसर अधिक आकर्षक, नियोजनबद्ध आणि भाविकांसाठी अनुरूप स्वरूपात विकसित करण्याचा मानस यामागे आहे. धार्मिक परंपरा, सांस्कृतिक वारसा आणि आधुनिकतेचा समतोल साधत मंदिर परिसराचे सौंदर्य अधिक खुलविण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प निश्चितच एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

# नवघर येथील ए.पी.एम टर्मिनर कंपनीत भरघोस पगार वाढ !!





**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख / एम.डी.भोईर** : उरण तालुक्यातील मौजे नवघर गावाच्या हद्दीतील ए.पी.एम टर्मिनर कंपनीत सर्वेअर कामगारांचा आज देव इंटरप्रायजेसचे मालक शेखर तांडेल यांच्या सोबत आठ वर्षा करीता करारनामा दत्ता सांमत यांच्या युनियन तर्फे करून २० हजाराची भरघोस वाढ करण्यात आली असून यावेळी या युनियनचे द्रोणागिरी नोड परिसराचे उपाध्यक्ष रोशन ठाकुर,सेक्रटरी धमेंद्र तांडेल तसेच ए.पी.एम टर्मिनरचे मॅनेजर योगेश ठाकुर आणि या कंपनी युनियनचे युनियन लिडर जयप्रकाश पाटील,ज्ञानेश्वर भोईर,निलेश भोईर यांच्यासह अनेक कामगार उपस्थीत होते तर या झालेल्या भरघोस पगार वाढीमुळे येथील कामगार वर्गात आनंदाचे वातावरण असून देव इंटरप्रायजेस कंपणीचे मालक शेखर तांडेल यांना सर्व कामगार वर्गाकडून तसेच नवघर परिसरातून आभार व्यक्त करून धन्यवाद देण्यात येत आहे.

# २२ वर्षांनंतर जुन्या आठवणींना उजाळा

## के.पी.बी.डी.हायस्कुल पाडळशिंगी च्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी भीमराव गावडे:** ज्या शाळेने आपल्याला घडवलं,त्या मातृसंस्थेचे आपण कायम ऋणी आहोत,' ही भावना मनात ठेवत पाडळशिंगी येथील के.पी.बी.डी. विद्यालयाच्या सन 2004-05 च्या दहावीच्या माजी विद्यार्थ्यांनी तब्बल 22 वर्षांनंतर एकत्र येत भावनिक आणि प्रेरणादायी स्नेहमेळावा उत्साहात साजरा केला.

या स्नेहमेळाव्यात माजी विद्यार्थ्यांनी केवळ जुन्या आठवणींना उजाळा दिला,नाहीतर भविष्यात शाळेस नेहमी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. पाडळशिंगी येथील के.पी.बी.डी. हायस्कुल दि.24 वार- रविवारी रोजी हा गेट-टुगेदर कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि थाटामाटात पार पडला. जवळपास 35 माजी विद्यार्थी, 15 विद्यार्थिनी आणि 6 शिक्षक या कार्यक्रमाला उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित शिक्षक व विद्यार्थ्यांचे फेटे बांधून स्वागत करण्यात आले. त्यानंतर घंटानाद आणि राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली.प्रमुख पाहुणे शाळेचे शिक्षक डोंगरदिवे सर ,करवंदे सर ,आव्हाड सर ,ओवाळ सर,कुरे सर ,वडमारे सर,आदी उपस्थित होते. विद्येची देवता सरस्वतीचे पूजन,क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले,रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज, बीड जिल्ह्याच्या पहिल्या महिला खासदार शिक्षण महर्षी स्व.केशर काकू क्षीरसागर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी विद्याथ्यर्थ्यांनी शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला.

'आम्ही आयुष्यात कुठेही गेलो तरी ज्या शाळेने आम्हाला घडवलं, तिची आठवण कधीच विसरणार नाही,' अशी भावना प्रस्ताविकेत श्री साई गावडे यांनी व्यक्त केली.विविध क्षेत्रात यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या अनुभवांचे मनोगत व्यक्त केले. "महाविद्यालयाने दिलेली शिकवण आणि मित्रांचे सहकार्य यामुळेच आज आम्ही यशस्वी झालो," अशा भावना अनेकांनी व्यक्त केल्या.

बावीस वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर मित्र-मैत्रिणी आणि गुरुजन एकत्र आल्याने वातावरण अत्यंत भावनिक झाले होते. हास्यविनोद, जुन्या आठवणीआणि शालेय जीवनातील किस्स्यांनी संपूर्ण परिसर भारावून गेला होता. या स्नेहमेळाव्यात माजी विद्यार्थ्यांनी शाळेच्या विकासासाठी पुढाकार घेण्याचा निर्धार केला.

गेट-टुगेदरमध्ये जुन्या आठवणींवरील चर्चा, मैत्रीचे किस्से आणि समूह छायाचित्र यामुळे वातावरण आनंदमय झाले होते. बावीस वर्षांनंतर एकत्र आल्याने सर्वांच्या चेहऱ्यावर विशेष आनंद दिसून येत होता.

'भविष्यातही शाळेच्या विकासासाठी आम्ही कायम खंबीरपणे उभे राहू,' अशी ग्वाही माजी विद्यार्थ्यांनी दिली. कार्यक्रमादरम्यान स्नेहभोजन आणि मनोरंजनाच्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.साई गावडे यांनी केले, तर बहारदार सूत्रसंचालन प्रा.उगले यांनी केले. आभार प्रदर्शन दामोदर सर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयोजक समितीने विशेष परिश्रम घेतले. शेवटी सर्वांनी पुन्हा भेटण्याचा संकल्प करत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# जनतेला तहानलेलं पाहून स्वस्थ बसलो नाही!

## स्वखर्चाने टँकर भरून युवा नगरसेवक सतीश उर्फ गल्लाभाऊ वानखेडे यांची पाणीसेवा

**दैनिक युवक आधार**
**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : वाशिम जिल्ह्यात सध्या तीव्र पाणीटंचाईची समस्या निर्माण झाली असून अनेक गावांमध्ये तसेच शहरातील विविध भागांत नागरिकांना पाण्यासाठी अक्षरशः वणवण भटकावे लागत आहे. विहिरी कोरड्या पडल्या आहेत, नळयोजना विस्कळीत झाल्या आहेत तर काही ठिकाणी नागरिकांना टँकरच्या प्रतीक्षेत तासन्तास उभे राहावे लागत आहे. या गंभीर परिस्थितीत अनेक लोकप्रतिनिधी केवळ बैठका आणि आश्वासनांपुरते मर्यादित राहिले असताना युवा नगरसेवक सतीश उर्फ गल्ला वानखडे यांनी मात्र थेट मैदानात उतरून जनतेसाठी पाण्याची सेवा सुरू केली आहे.



"कुठल्याही नगरपरिषदेच्या निधीची वाट पाहणार नाही आणि कुठलाही राजकीय विचार करणार नाही," अशी ठाम भूमिका घेत सतीश उर्फ गल्ला वानखडे यांनी स्वखर्चाने पाण्याचे टँकर भरून गरजू नागरिकांना पाणीवाटप करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. त्यांच्या या कार्यामुळे अनेक वस्त्यांमधील नागरिकांना मोठा दिलासा मिळत असून, पाण्यासाठी होणारी धावपळ काही प्रमाणात कमी झाली आहे.विशेष म्हणजे, वाढत्या उन्हामुळे नागरिक त्रस्त झालेले असताना अनेक भागांत महिलांना आणि ज्येष्ठ नागरिकांना पाण्यासाठी मोठ्या संकटाचा सामना करावा लागत आहे. अशा वेळी गल्ला वानखडे यांनी कोणताही गाजावाजा न करता प्रत्यक्ष लोकांपर्यंत पाणी पोहोचवण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या या उपक्रमामुळे सामान्य नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, "खरा लोकप्रतिनिधी असा असतो," अशा प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करत आहेत.

> **"राजकारणासाठी नाही, तर जनतेच्या जगण्यासाठी मी मैदानात उतरलो आहे.जोपर्यंत शेवटच्या घरापर्यंत पाणी पोहोचत नाही, तोपर्यंत माझी ही सेवा थांबणार नाही."**
> **— युवा नगरसेवक सतीश उर्फ गल्ला वानखडे**

युवा नगरसेवक सतीश उर्फ गल्ला वानखडे यांनी यावेळी बोलताना सांगितले की, "जनतेला तहानलेलं पाहून मी शांत बसू शकत नाही. राजकारण नंतरही करता येईल; पण संकटाच्या काळात लोकांसोबत उभं राहणं हेच खरं कर्तव्य आहे. जनतेची सेवा हाच माझा धर्म आहे आणि ही सेवा पुढेही सुरू राहणार आहे."

दरम्यान, वाशिम जिल्ह्यातील पाणीप्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला असून प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे. मात्र या कठीण परिस्थितीत युवा नगरसेवक सतीश उर्फ गल्ला वानखडे यांनी दाखवलेली सामाजिक बांधिलकी आणि तत्परता सध्या जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरत आहे. "पाणी म्हणजे जीवन… आणि जीवन वाचवण्यासाठी गल्ला वानखडे मैदानात!" संकटाच्या काळात फक्त आश्वासनं नाहीत, तर प्रत्यक्ष कृती करणारा लोकप्रतिनिधी म्हणून युवा नगरसेवक सतीश उर्फ गल्ला वानखडे यांचे नाव आता नागरिकांच्या तोंडी ऐकायला मिळत आहे.

स्वखर्चातून सुरू केलेली ही पाणीसेवा अनेकांसाठी जीवनदायी ठरत असून त्यांच्या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

**सोमलवाडा / मेंढा येथे पाण्यासाठी हाहाकार**

# जलस्त्रोत आटले, टाकी कोरडी; ग्रामपंचायतीच्या उदासीनतेमुळे नागरिकांचे हाल

**दैनिक युवक आधार**
**रोशन खोब्रागडे लाखनी** - उन्हाळ्याची तीव्रता वाढत असताना लाखनी तालुक्यातील सोमलवाडा / मेंढा परिसरात भीषण पाणीटंचाईने नागरिकांचे जगणे अक्षरशः असह्य केले आहे. गावातील विहिरी, बोअरिंग आणि इतर जलस्त्रोत पूर्णपणे आटल्याने पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. परिस्थिती इतकी भयावह झाली आहे की, गावातील पाणीपुरवठा टाकीत सुद्धा पाण्याचा थेंब उरलेला नाही.

ग्रामपंचायत प्रशासन मात्र या गंभीर प्रश्नाकडे डोळेझाक करत असल्याचा संताप ग्रामस्थांमध्ये व्यक्त होत आहे. गावातील महिला, वयोवृद्ध नागरिक आणि लहान मुलांना पाण्यासाठी मैलोनमैल पायपीट करावी लागत असून, उन्हाच्या झळांमध्ये रिकामे हंडे घेऊन फिरण्याची वेळ नागरिकांवर आली आहे.

विशेषतः वृद्ध महिलांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. पाण्यासाठी दूरवर जावे लागत असल्याने अनेकांना शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे. "नळ योजना फक्त कागदावरच आहे का?" असा संतप्त सवाल ग्रामस्थ प्रशासनाला विचारत आहेत.

गावात पाणीपुरवठा यंत्रणा पूर्णपणे कोलमडलेली असताना ग्रामपंचायत आणि संबंधित प्रशासनाकडून कोणतीही तातडीची उपाययोजना करण्यात आलेली नाही. परिणामी नागरिकांमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला आहे.

पाण्यासाठी टँकर असूनही टँकरद्वारे पाणीपुरवठा अजूनही सुरू करण्यात आलेला नाही. "लोकांना पिण्याचे पाणी मिळत नसताना प्रशासन नेमके काय करत आहे?" असा सवाल आता सर्वसामान्य नागरिक उपस्थित करीत आहेत.

दरवर्षी उन्हाळ्यात उद्भवणाऱ्या या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात प्रशासन अपयशी ठरत असल्याने नागरिकांचा संयम आता संपत चालला आहे. पाणी हा मूलभूत अधिकार असताना नागरिकांना थेंबासाठी भटकंती करावी लागणे ही ग्रामपंचायत प्रशासनासाठी लाजिरवाणी बाब असल्याची भावना गावात व्यक्त होत आहे.

# सणसर ओढा व चारी खोलीकरणासाठी कृषीमंत्र्यांकडे निवेदन

**दैनिक युवक आधार**
**सणसर/ विकास क्षत्रिय** : दि. 25 मे 2026 रोजी पुणे येथे महाराष्ट्र राज्याचे कृषीमंत्री मा.ना.श्री. दत्तात्रय मामा भरणे यांची भेट घेऊन ग्रामपंचायत सणसर हद्दीतील संपूर्ण ओढा व चारी खोलीकरण-सुशोभिकरण करण्याबाबत सिल्वर ओक प्रतिष्ठाणतर्फे निवेदन देण्यात आले.

दरवर्षी पावसाळ्यात सणसर ओढ्याला पुर येऊन परिसरात मोठे नुकसान होत असल्याने, पावसाळ्यापूर्वी ओढ्याचे खोलीकरण झाले तर नुकसान टाळता येईल, अशी मागणी करण्यात आली.या निवेदन देतेवेळी सिल्वर ओक प्रतिष्ठाणचे सदस्य सणसर सोसायटीचे माजी चेअरमन विक्रमभैय्या निंबाळकर,सणसर गावचे



माजी उपसरपंच अभयसिंह निंबाळकर,ॲड. विलास खटके,राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ओबीसी सेल इंदापूर तालुका उपाध्यक्ष नेताजी गायकवाड आदी सदस्य उपस्थित होते.सिल्वर ओक प्रतिष्ठाणने कृषीमंत्र्यांकडे विनंती केली की, पावसाळ्यापूर्वी सणसर ओढा व चारीचे खोलीकरण-सुशोभिकरण करून मिळावे, जेणेकरून गावातील नागरिकांना पुरामुळे होणाऱ्या नुकसानीपासून दिलासा मिळेल.

# अतिरिक्त शिक्षकांचे वेतन काढण्यात यावे, क्रांतिकारी शिक्षक संघटनेची मागणी

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) :** बीड जिल्ह्यातील अतिरिक्त ठरवलेल्या शिक्षकांच्या वेतनप्रश्नी पुन्हा एकदा तणाव निर्माण झाला आहे. क्रांतिकारी शिक्षक संघटना, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने शिक्षणाधिकारी प्राथमिक यांना निवेदन दिले. या दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, १७ एप्रिल २०२६ रोजी अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. मात्र, संबंधित शिक्षकांना रुजू करून घेण्यात काही शाळांकडून टाळाटाळ करण्यात येत असल्याचा आरोप करण्यात




आला आहे. संघटनेच्या म्हणण्यानुसार, या पूर्वीही या संदर्भात लेखी अर्ज देण्यात आले होते, तरी ही शिक्षण विभागाकडून कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. परिणामी अनेक शिक्षकांचे मासिक वेतन थांबले असून त्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या वर उपाय म्हणून संबंधित शिक्षकांचे वेतन मूळ शाळेतून अदा करण्याची मागणी संघटनेने केली आहे. अन्यथा ०१ जून २०२६ पासून लोकशाही व अहिंसक मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा ही देण्यात आला आहे. या वेळी संघटनेचे राज्य सचिव श्री.शाहेद कादरी सर, अजीज राजा सर, जाधव सर, गिते सर सह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ आणि 'नाम' फाऊंडेशनच्या सहकार्याने पेंच कालव्यांची स्वच्छता आणि दुरुस्ती

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू संपादक नागपूर विभाग** : नागपूर जिल्ह्याची जीवनदायिनी असलेल्या पेंच बहुउदेशीय प्रकल्पाच्या कालव्यांची स्वच्छता व दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरु आहे. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ आणि प्रसिद्ध अभिनेते नाना पाटेकर व मकरंद अनासपुरे यांच्या 'नाम फाऊंडेशन' या स्वयंसेवी संस्थेने एकत्र येत ही कालवा स्वच्छता व दुरुस्ती मोहीम सुरु केली आहे. या मोहिमेमुळे कालव्याच्या विसर्ग क्षमतेत वाढ होईल आणि सिंचनाची व्यवस्था सुरळीत होण्यासह पाणीबचतही निश्चितपणे होणार असल्याचा विश्वास सिंचन विभागातील अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

यावर्षी सुपर अल निनो आणि आयओडीच्या प्रभावामुळे कमी पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार शासन स्तरावरून पाण्याचे योग्य नियोजन व पाणी बचतीसाठी गंभीर पावले उचलली जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

पेंच प्रकल्पाच्या उजव्या, डाव्या आणि उच्च पातळी अशा ३ मुख्य कालव्यांसह १७ शाखा कालवे, ३५ वितरिका व ८२५ लघु कालवे असे एकूण ८८० कालव्यांचे सुमारे १७७९ कि.मी.चे विस्तीर्ण जाळे पसरलेले




आहे. या माध्यमातून १ लाख हेक्टरपेक्षा अधिक लाभक्षेत्राला सिंचनाचा फायदा मिळतो. मात्र, वर्षानुवर्षे साचलेला गाळ, वाढलेले गवत आणि झाडीझुडपे यांमुळे कालव्यांची वहन क्षमता मंदावली होती. वेळेवर पाणी न मिळणे किंवा कालवे फुटणे, सिंचन वेळेवर न होणे, सिंचनाचा आवर्तन कालावधी वाढणे, पृष्ठभागात पाणी न पोहोचणे अशा समस्या भेडसावत होत्या. जलसंपदा विभागामार्फत यांत्रिकी मंडळाच्या संयत्राद्वारे पाखरण कार्यक्रमांतर्गत कालवा स्वच्छता मोहिम दरवर्षी राबविली जाते. तथापि, अपुरे तांत्रिक मनुष्यबळ व संयंत्रे यामुळे कालवा स्वच्छात मोहिम सर्वच ठिकाणी एकाच वेळेस राबविणे आव्हानात्मक होते.

यावर मात करण्यासाठी आता नाम फाउंडेशनच्या यंत्रसामुग्रीच्या साहाय्याने गाळ काढणे, भराव टाकणे आणि दुरुस्तीची कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. सुमारे १७४ कालव्यांची स्वच्छता होणार

या मोहिमेअंतर्गत एकूण ४,१०,००० मीटर लांबीच्या १७१ कालव्यांची स्वच्छता करण्याचे नियोजन असून, २३,३०० हेक्टर क्षेत्राला याचा लाभ होणार आहे. आतापर्यंत यापैकी ४६ कालव्यांचे ६४,००० मीटर लांबीचे कालवा स्वच्छतेचे काम नाम फाउंडेशन मार्फत करण्यात आले असून, ५,३०० हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळणार आहे.

**सामंजस्य करार**

जलसंपदा विभागाच्या विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ आणि 'नाम फाउंडेशन' या स्वयंसेवी संस्थेच्या पुढाकाराने पेंच पाटबंधारे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात कालवा स्वच्छता मोहीम मोठ्या प्रमाणावर राबवण्यासाठी 'सामंजस्य करार' करण्यात आला होता. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जयंती वर्षानिमित्त आयोजित जलव्यवस्थापन कृषी पंधरावड्यादरम्यान या प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात आली आहे. नाम फाऊंडेशनच्या सामाजिक बांधिलकीतून उपलब्ध करुन देण्यात आलेल्या यंत्रसामुग्रीमुळे या कामांना गती मिळाली आहे.

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक राजेश सोनटक्के, अधीक्षक अभियंता सोनाली चोपडे यांच्या पुढाकाराने आणि पेंच पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता अनिता पराते यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबवली जात आहे. जलसंपदा विभागाचे उपअभियंता राजेश पाटील, राजेश राहुलवार, विवेक झाडे, मुकुंद डांगे, सुरज बोरेले, दिलीप भागवतकर, रोशन नरड तसेच नाम फाउंडेशनचे राज्य समन्वयक राजाभाऊ शेळके व दत्तात्रय गरजे या कामासाठी विशेष परिश्रम घेत आहेत.

पेंच पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता अनिता पराते यांनी सांगितले की, या कालवा स्वच्छता मोहिमेमुळे कालव्यांची विसर्ग क्षमता वाढून सिंचन सुरळीत होईल आणि पाण्याची मोठी बचत होईल.

ही कामे दर्जेदार स्वरुपात व्हावीत, असे आमचे प्रयत्न आहेत. नागपूर जिल्ह्यातील मौदा तालुक्यातील मौजा पिंपरी येथील शेतकरी भाऊराव किरपान यांनी सांगितले की, कालवा स्वच्छता मोहिमेमुळे पाण्याचा प्रवाह सुधारून याचा थेट फायदा परिसरातील शेतकऱ्यांना होणार आहे. जलसंपदा विभाग आणि नाम फाउंडेशन यांनी संयुक्तपणे राबवलेला हा उपक्रम कौतुकास्पद आहे.

भविष्यातही अशा कामांना प्राधान्य दिल्यास शेतकऱ्यांना मोठी मदत होईल.

# घाटंजीमध्ये श्री संत भीमा भोई जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी - महेश पेन्दोर** : स्थानिक घाटंजी शहरासह संपूर्ण तालुक्यामध्ये २५ मे रोजी श्री संत भीमा भोई जयंती उत्सव अत्यंत उत्साहात, भक्तीमय आणि चैतन्यमय वातावरणात साजरा करण्यात आला. समाजात एकजुटता आणि एकतेची भावना अधिक दृढ व्हावी, या उदात्त उद्देशाने भोई समाज संघटनेचे घाटंजी तालुका अध्यक्ष निरज मन्ने यांनी संपूर्ण तालुक्यात जयंती साजरी करण्याचे आवाहन केले होते. त्यांच्या या आवाहनाला संपूर्ण तालुक्यातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तालुक्यातील खेडोपाडी आणि विविध गावांमध्ये हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला, तर अनेक ठिकाणी भव्य आणि शिस्तबद्ध मिरवणुका काढून परिसराचे वातावरण भक्तीमय करून सोडले होते.



याच सोहळ्याचे औचित्य साधून घाटंजी शहरात समाज प्रबोधनाच्या एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून घाटंजीचे नगराध्यक्ष परेश कारीया, अंकुश ठाकरे, प्रशांत मस्के आणि नगरसेवक शुभम उदार प्रामुख्याने उपस्थित होते. तर मुख्य वक्ते म्हणून लाभलेले महाराष्ट्र प्रदेश भोई समाज सेवा संघ युवा अध्यक्ष राहुलजी पडाल यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आणि वक्त्यांनी आपल्या प्रबोधनातून, "समाजात नेहमी एकता आणि एकजुटता टिकवून ठेवा," असे आवाहन करत समाज प्रगतीचा मोलाचा संदेश दिला.

कार्यक्रमाची सुरुवात शितल मन्ने यांनी केलेल्या अभ्यासपूर्ण प्रास्ताविकाने झाली, तर संपूर्ण कार्यक्रमाचे अत्यंत उत्कृष्ट आणि नेटके सूत्रसंचालन निरज मन्ने यांनी आपल्या शैलीत सांभाळले. हा भव्य उत्सव यशस्वी करण्यासाठी 'श्री संत भीमा भोई महोत्सव समिती'च्या सर्व सदस्यांनी रात्रंदिवस अथक परिश्रम घेतले. यामध्ये प्रामुख्याने कार्यक्रम अध्यक्ष निकेत गिनगुले, उपाध्यक्ष आश्विन सातघरे, सचिव गणेश बावणे यांच्यासह सर्व कार्यकर्त्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाच्या सांगतेप्रसंगी नितेश बावणे यांनी उपस्थित सर्व प्रमुख अतिथी, वक्ते, महोत्सव समितीचे पदाधिकारी आणि नागरिकांचे आभार मानले.

# मोबाईलच्या आभाशी जगातून बाहेर पडून बालकलाकारांनी कॅनवास वर सजवली रंगांची दुनिया!

## उरणच्या रंगोत्सव २०२६ चित्र प्रदर्शनाला कालाप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद!

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी** : आजच्या डिजिटल युगात २४ तास मोबाईलच्या स्क्रीन मध्ये हरवून चाललेल्या बालपणीला रंगांची जिवंत दुनिया दाखवण्यासाठी आणि त्यांच्यातील नैराश्य दूर करून कलात्मक दृष्टिकोन रुजविण्यासाठी एका भव्य उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'योशिता आर्ट क्लासेस' आणि 'मथुरा महादेव एज्युकेशन सेंटर' यांच्या संयुक्त विद्यमाने उरण येथील जे. एन. पी. ए. स्टाफ क्लब मध्ये 'रंगोत्सव २०२६' (बॅच दोन) या भव्य ॲक्रेलिक कॅनव्हास पेंटिंग प्रदर्शनाचे अत्यंत उत्साहात उद्घाटन संपन्न झाले. या प्रदर्शनाच्या निमित्ताने बालकलाकारांना त्यांचे कलागुण सादर करण्यासाठी एक मोठे व्यासपीठ मिळाले आहे.

कार्यक्रमाची सुरुवात उपस्थितांच्या टाळ्यांच्या कडकडाटात मान्यवरांचे स्वागत करून झाली. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले उरण मधील जेष्ठ पत्रकार सौ. तृप्ती भोईर, महाराष्ट्र राज्य कला अध्यापक संघाच्या महिला अध्यक्षा श्रीमती प्रियवंदा तांबोटकर, शिक्षक नेते तथा



मुख्याध्यापक श्री. रमाकांत गावंड सर आणि श्री. गणेश ठाकूर उपस्थित होते. या सर्व मान्यवरांच्या हस्ते कलेची देवता नटराज मूर्तीला पुष्पहार अर्पण करून, दीपप्रज्वलन करून या भव्य चित्र प्रदर्शनाचे अधिकृतउद्घाटन करण्यात आले.

याप्रसंगी उपस्थित पाहुण्यांनी बालकलाकारांना, पालकांना आणि मिलिंद सरांच्या कार्याला दाद देत आपले विचार मांडले.

ज्येष्ठ पत्रकार तृप्ती भोईर म्हणाल्या "मिलिंद सरांच्या मार्गदर्शनाखालील मुले भाग्यवान असून त्यांच्या मार्गदर्शनामुळे माझा मुलगा आजही कला जोपासत आहे.सुंदर स्केचेस काढत आहे. सरांच्या गोष्टी आत्मसात केल्यास मुलांचे भविष्य उज्वल आहे" प्रियवंदा तांबोटकर मॅडम म्हणाल्या "मोबाईलच्या जगात हरवण्याऐवजी मुलांनी चित्र, शिल्प, नाट्य ,गायन, वादनाचा हात धरावा त्यातून खरा आनंद मिळतो यावेळी त्यांनी मिलिंद सरांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले "रमाकांत गावंड सरांनी आपल्या मनोगतात म्हणाले, "मुलांनी साकारलेले प्रत्येक चित्र त्यांच्या मनाचा कोपरा आणि स्वभाव दर्शवतो आजच्या काळात अशी प्रदर्शने भरवणे काळाची गरज असून समाजासाठी सर हे मोठे काम करत आहेत" गणेश ठाकूर यांनी सर्व बाल कलाकारांचे कौतुक केल्याने पुढील यशस्वी कलात्मक प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या.

या प्रदर्शनाचे मुख्य वैशिष्ट्य राष्ट्रीय चित्रकला स्पर्धेत राष्ट्रीय विजेत्या विद्यार्थिनींचा विशेष गौरव करण्यात आला यामध्ये कुमारी साक्षी गणेश ठाकूर कुमारी भार्गवी रुपेश म्हात्रे आणि कुमारी स्वरा रामानंद जाधव या तिन्ही राष्ट्रीय विजेत्या विद्यार्थिनींना मान्यवरांच्या हस्ते आकर्षक भेटवस्तू आणि योशिता ठाकूर यांनी स्वतः तयार केलेले सुंदर पुष्प देऊन दिमागदार पद्धतीने गौरविण्यात आले. त्यांच्या उत्कृष्ट कलाकृतींचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले .याशिवाय रंगोत्सवात सहभागी झालेल्या सर्व बालकालाकारांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन प्रोत्साहित करण्यात आले. उरण परिसरातील शेकडो कलाप्रेमी व पालकांनी प्रदर्शनाला भेट देऊन मुलांच्या कल्पकतेची भरभरून प्रशंशा केली.

कार्यक्रमा त प्रसिद्ध बिल्डर्स नरसू पाटील यांनी चित्र प्रदर्शनाला भेट दिली आणि त्यांनी बालकलाकारांच्या अद्भुत कलाकृतीचे आणि त्यांच्यातील सर्जनशीलतेचे तोंड भरून कौतुक केले. कार्यक्रमाचे शेवटी चित्रकार मिलिंद ठाकूर सर यांनी उपस्थित सर्व पाहुणे, रसिक, कला प्रेमी ,जागरूक पालक ,सहभागी विद्यार्थी, तसेच सुंदर जागा उपलब्ध करून देणारे जे एनपीए स्टाफ क्लब व्यवस्थापन यांचे मनापासून आभार मानले. हा भव्य सोहळा उरणच्या सांस्कृतिक विश्वात एक नवा आदर्श निर्माण करून संपन्न झाला.

# कडक उन्हाळा अन् विजेचा वाढता 'लोड'; जाणून घ्या यंत्रणेवरील ताण आणि वीज पुरवठ्याची अपरिहार्य तांत्रिक बाजू

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग** : वाढत्या उन्हाच्या तीव्रतेत नागरिकांना दिलासा देण्यासाठी वीज कंपन्यांचे अधिकारी आणि तंत्रज्ञ २४ तास मैदानावर उतरून अविरत सेवा देत आहेत. उन्हाळ्यात विजेची मागणी विक्रमी पातळीवर पोहोचत असल्याने तांत्रिक आणि नैसर्गिक कारणांमुळे वीज पुरवठा खंडित होतो. ही तात्पुरती अस्वस्थता विजेच्या तुटवड्यामुळे नसून, उन्हाळ्यात घरे, कार्यालये आणि व्यावसायिक ठिकाणी AC, कुलर्स व पंख्यांचा एकाच वेळी वापर वाढल्याने यंत्रणेवर 'पीक डिमांड'चा प्रचंड ताण येतो.

नागपूर शहरात फेब्रुवारी महिन्यातील ४७० मेगावॅटची मागणी उन्हाळ्याच्या सुरुवातीला ८०० मेगावॅटवर आणि आता थेट ९५० मेगावॅटच्या विक्रमी पातळीवर पोहोचली आहे. या अफाट वाढीमुळे रात्रीच्या वेळी नागरिक घरी परतल्यावर स्थानिक ट्रान्सफॉर्मर (रोहित्र) ओव्हरलोड होतात. बाहेरील उष्णता आणि अंतर्गत लोडमुळे ट्रान्सफॉर्मरमधील ऑइल कमालीचे गरम होऊन मोठे नुकसान टाळण्यासाठी सुरक्षा फ्यूज स्वतःहून उडतो (Fuse Blowing); हा बिघाड दुरुस्त करण्यासाठी वीज कर्मचारी रात्री-अपरात्रीही तत्परतेने काम करत असतात.

या तांत्रिक कारणांसोबतच एप्रिल-मे महिन्यातील अचानक येणारे वादळी वारे, विजांचा कडकडाट आणि मान्सूनपूर्व पावसामुळे झाडे कोसळून तारा तुटतात. अशा वेळी कोणतीही जीवितहानी टाळण्यासाठी, ग्राहकांच्या सुरक्षेचा उपाय म्हणून वीज पुरवठा जाणीवपूर्वक बंद ठेवून वादळ शमल्यानंतर युद्धपातळीवर दुरुस्ती केली जाते. याव्यतिरिक्त, आगामी पावसाळ्यात अखंडित सेवा मिळावी म्हणून धोकादायक झाडांच्या फांद्या छाटणे, नादुरुस्त इन्सुलेटर बदलणे आणि सबस्टेशनची तातडीची दुरुस्ती करण्यासाठी 'पावसाळा पूर्व नियोजित कामे' (Pre-Monsoon Maintenance) केली जातात; भविष्यातील मोठे बिघाड टाळण्यासाठी हे पूर्वनियोजित शटडाऊन अत्यंत आवश्यक असतात.

दुसरीकडे, जिल्ह्याची वीज वितरण यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी आशियाई विकास बँकेच्या (ADB) सहकार्याने ६०२.९८ कोटी रुपयांचा महत्त्वाकांक्षी विकास आराखडा राबवण्यात येत आहे. याअंतर्गत शहर मंडळातील ९ आणि ग्रामीण भागातील १२ मोक्याच्या ठिकाणी एकूण २१ नवीन अतिउच्च दाबाची (३३/११ केव्ही) उपकेंद्रे उभारली जात असून, ७ विद्यमान उपकेंद्रांची क्षमतावाढ केली जात आहे. ग्राहकांना सातत्यपूर्ण दाबाने वीज मिळण्यासाठी ४०५ नवीन ट्रान्सफॉर्मर्स, १५६ किलोमीटरची नवीन उपरी वाहिनी आणि ३०० किलोमीटरची अत्याधुनिक भूमिगत वाहिनी टाकण्याचे प्रस्तावित आहे. याशिवाय टाऊन डीपीआर अंतर्गत तब्बल ७८३ कोटींच्या कामाची निविदा प्रक्रिया सुरू झाली असून, त्यात २४ नवीन उपकेंद्रे उभारणे, ८ उपकेंद्रात नवीन रोहित्र बसवणे, ४ उपकेंद्रातील रोहित्रांची क्षमतावाढ करणे यासह १४१.६ किमी लांबीची ३३ केव्ही उपरी, ४०७.१ किमी भूमिगत आणि १०३.५ किमी लांबीची ११ केव्ही उपरी व ३५०.५ किमी भूमिगत वीज वाहिनी उभारण्याच्या कामांचा समावेश आहे. एकूण १३८५ कोटींहून अधिक खर्चाच्या या सर्व कामांमुळे जिल्ह्यातील वीज वितरण यंत्रणा अधिक सक्षम होणार आहे. उन्हाळ्यातील वीज खंडित होणे ही अपघात टाळणारी एक अपरिहार्य तांत्रिक प्रक्रिया असून हजारो कर्मचारी ग्राहकांसाठी २४ तास कार्यरत आहेत; त्यामुळे ग्राहकांनीही दुपारी आणि रात्रीच्या 'पीक अवर्स'मध्ये विजेचा अपव्यय टाळून, जड उपकरणे गरजेनुसारच चालवून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

# आ. भावनाताई गवळी पाटील यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याची जय्यत तयारी

## मालेगावात शिवसैनिकांचा जल्लोष ; बालाजी लॉनवर उद्या होणार शक्तिप्रदर्शन

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : शिवसेना पक्ष नेत्या तथा विधान परिषद आमदार भावनाताई गवळी पाटील यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त मालेगाव शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून शिवसैनिकांनी या कार्यक्रमासाठी जोरदार तयारी सुरू केली आहे. बुधवार दिनांक २७ मे २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता शेलू रोडवरील बालाजी लॉन येथे हा भव्य अभिष्टचिंतन सोहळा पार पडणार आहे.

शिवसेना संघटनेत आपल्या दमदार नेतृत्व, स्पष्ट भूमिका आणि जनसामान्यांच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठविणाऱ्या नेत्या म्हणून भावनाताई गवळी पाटील यांची ओळख निर्माण झाली आहे. ग्रामीण भागापासून शहरांपर्यंत शिवसैनिकांमध्ये त्यांच्याबद्दल मोठा आदर असून त्यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या अभिष्टचिंतन सोहळ्याला ऐतिहासिक प्रतिसाद मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



मालेगाव शहरासह तालुक्यातील विविध भागांतून कार्यकर्ते, महिला आघाडी, युवा सेना पदाधिकारी, शिवसैनिक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. कार्यक्रमाच्या निमित्ताने संपूर्ण परिसरात स्वागत फलक, बॅनर आणि सजावटीद्वारे जल्लोषाचे वातावरण तयार करण्यात आले आहे.

या सोहळ्याचे आयोजन लोकनियुक्त युवा नगराध्यक्ष ओमप्रकाश खुरसडे, नगर परिषद उपाध्यक्ष सौ. राधाताई खवले तसेच शिवसेना तालुकाप्रमुख प्रदीप पाटील कुटे यांच्या प्रमुख पुढाकारातून करण्यात आले आहे. आयोजकांनी सर्व शिवसैनिक, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन केले आहे.

राजकीय व सामाजिक क्षेत्रात सक्रिय असलेल्या भावनाताई गवळी पाटील यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी आयोजित हा सोहळा मालेगावातील शिवसेनेच्या शक्तिप्रदर्शनाचा केंद्रबिंदू ठरणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

कार्यक्रमादरम्यान विविध मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार, शुभेच्छा वर्षाव आणि कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळणार आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्ष सोहळ्यानिमित्त 'भरारी २०२६' करिअर मार्गदर्शन शिबीर व गुणवंत विद्यार्थी सत्कार उत्साहात

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)** : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्ष सोहळ्यानिमित्त आयोजित करण्यात आलेला "भरारी २०२६" हा गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ व करिअर मार्गदर्शन शिबीर पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. पनवेल परिसरातील ५३ शाळांमधील १२० गुणवंत विद्यार्थ्यांचा यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाचा गौरव करत त्यांना पुढील शिक्षण व करिअरसाठी प्रेरणा देण्यात आली. या कार्यक्रमात जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या संघर्षमय जीवन प्रवासातील अनुभव विद्यार्थ्यांसमोर मांडले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून स्वतःचे व्यक्तिमत्त्व घडवत समाजात वेगळे स्थान निर्माण केले, याबद्दलची माहिती देत त्यांनी विद्यार्थ्यांना जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी प्रेरित केले. मेहनत, चिकाटी आणि सकारात्मक दृष्टिकोन यांच्या जोरावर यश मिळविता येते,




असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला तसेच त्यांच्या पुढील शैक्षणिक आणि व्यावसायिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाला प्रमुख मान्यवर म्हणून भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील, नगरसेवक परेश ठाकूर, नगरसेवक रवींद्र जोशी, माजी नगरसेवक अनिल भगत, एम. के. सी. एल., पुणे महाव्यवस्थापक नटराज कटकधोंड, एम. के. सी. एल., कोंकण विभाग मेंटॉर जयंत भगत, कोकण विभागीय समन्वयक मंगेश जाधव, रायगड जिल्हा समन्वयक सिद्धेश गोसावी यांची प्रमुख उपस्थिती लाभली.कार्यक्रमास विद्यार्थ्यांसह पालक आणि विविध शाळांचे मुख्याध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या शिबिरामध्ये प्रसिद्ध करिअर मार्गदर्शक, लेखक व व्याख्याते प्रा. विजय नवले यांनी "इयत्ता दहावी व बारावी नंतरचे AI युगातील करिअर्स" या विषयावर विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात AI, डेटा सायन्स, सायबर सिक्युरिटी, डिजिटल मार्केटिंग, ॲनिमेशन, गेम डेव्हलपमेंट तसेच विविध आधुनिक क्षेत्रांमध्ये उपलब्ध असलेल्या करिअर संधींबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली. विद्यार्थ्यांनी पारंपरिक शिक्षणासोबत कौशल्य विकासावर भर देत भविष्यातील स्पर्धेसाठी स्वतःला तयार ठेवावे, असे आवाहन त्यांनी केले. तसेच मा. श्री. नटराज कटकधोंड (महाव्यवस्थापक, एम. के. सी. एल., पुणे) यांनी विद्यार्थ्यांना MS-CIT, KLiC Courses तसेच AI आधारित शिक्षण आणि भविष्यातील तंत्रज्ञान याबाबत मार्गदर्शन केले. आधुनिक युगात डिजिटल कौशल्यांचे महत्त्व वाढत असून विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाचा सकारात्मक आणि प्रभावी वापर करून स्वतःला सक्षम बनवावे, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित (एम. के. सी. एल.) रायगड विभाग यांच्या वतीने करण्यात आले होते. पनवेल तालुक्यातील सर्व अधिकृत MS-CIT केंद्रांचा या उपक्रमात सहभाग होता. उपस्थित विद्यार्थ्यांनी, पालकांनी आणि मुख्याध्यापकांनी कार्यक्रमाचे कौतुक करत हा उपक्रम अत्यंत प्रेरणादायी आणि मार्गदर्शक असल्याची भावना व्यक्त केली.

# शालेय साहित्यांच्या दरवाढीने पालकांचे कंबरडे मोडले!

## शिक्षणाचा हक्क की महागाईचा शाप?

**दैनिक युवक आधार**

**पनवेल दिपक कोळवणकर प्रतिनिधी** : नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वीच राज्यातील लाखो पालकांना महागाईचा जबरदस्त फटका बसला आहे. शालेय साहित्य, गणवेश, वह्या-पुस्तके, दप्तर, कंपास बॉक्स, वॉटर बॉटल, टिफिन यांसह जवळपास सर्वच वस्तूंच्या किमतींमध्ये मोठी वाढ झाल्याने पालकांचे आर्थिक गणित पूर्णपणे बिघडले आहे.




कच्च्या मालाच्या वाढत्या किमती, इंधन दरवाढ आणि वाहतूक खर्चातील वाढ याचा थेट परिणाम शालेय साहित्यांच्या दरांवर झाला आहे. मुंबईसह राज्यातील अनेक बाजारपेठांमध्ये वह्या, पुस्तके, गणवेश आणि इतर शैक्षणिक साहित्यांचे भाव गगनाला भिडले आहेत. काही ठिकाणी छापील किमतीपेक्षाही जास्त दराने साहित्याची विक्री होत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत.

स्कूल बॅग आणि कंपास बॉक्सच्या किमतींमध्ये 20 ते 30 टक्के वाढ झाली आहे. वॉटर बॉटल आणि टिफिनच्या दरात 15 ते 25 टक्के वाढ झाली असून पेन, पेन्सिल आणि रंगसाहित्यात 10 ते 15 टक्के वाढ नोंदवली जात आहे. गणवेशाच्या किमतींमध्येही 25 ते 30 टक्क्यांपर्यंत वाढ झाल्याने पालकांची चिंता आणखी वाढली आहे.

महागाईने आधीच त्रस्त असलेल्या कुटुंबांवर शालेय साहित्यांच्या दरवाढीचा आणखी एक आर्थिक भार पडला आहे. शिक्षणाशी संबंधित जवळपास प्रत्येक वस्तू महाग झाल्याने नवीन शैक्षणिक वर्ष अनेक पालकांसाठी चिंतेचे कारण ठरत आहे. एका बाजूला शिक्षण हा प्रत्येक मुलाचा मूलभूत हक्क असल्याचे सांगितले जाते, तर दुसऱ्या बाजूला त्या शिक्षणासाठी लागणाऱ्या साहित्याच्या वाढत्या किमती सामान्य आणि मध्यमवर्गीय कुटुंबांना आर्थिक अडचणीत ढकलत आहेत. मुलांच्या शिक्षणासाठी आवश्यक साहित्य खरेदी करताना अनेक कुटुंबांना अतिरिक्त आर्थिक ताण सहन करावा लागत आहे. वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर शिक्षणाचा खर्च दिवसेंदिवस वाढत असून पालकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. शाळेची घंटा वाजण्याआधीच महागाईची घंटा पालकांच्या खिशावर वाजू लागल्याचे चित्र सध्या राज्यभर पाहायला मिळत आहे.

# डिझेलचा काळाबाजार रोखण्याची श्री व्यंकटेश्वर प्रतिष्ठानची तहसीलदारांकडे मागणी

**दैनिक युवक आधार**

**सेलू, प्रतिनिधी शिवाजी पवार** : शहर व तालुक्यात डिझेलचा वाढता तुटवडा आणि सुरू असलेला कथित काळाबाजार तात्काळ रोखावा, तसेच शेतकऱ्यांना नियमित व सुरळीत डिझेल पुरवठा उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी श्री व्यंकटेश्वर प्रतिष्ठान, सेलू यांच्या वतीने तहसीलदार तथा पुरवठा अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

तहसील कार्यालय, सेलू येथे सादर करण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सध्या शेतीच्या पेरणीपूर्व मशागतीची कामे सुरू असून बहुतांश शेतकरी ट्रॅक्टर व जेसीबीच्या साहाय्याने शेतीची कामे करत आहेत. मात्र, या यंत्रांसाठी आवश्यक असलेले डिझेल सहज उपलब्ध होत नसल्याने शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. पेट्रोल पंपांवर दिवस-रात्र रांगेत उभे राहूनही डिझेल मिळेल की नाही, याची शाश्वती नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

प्रचंड उष्णतेमध्ये शेतकरी तासन्तास रांगेत उभे राहत असूनही त्यांना डिझेल मिळत नसल्याने तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. दुसरीकडे, काळ्या बाजारात डिझेल तब्बल १५० रुपये प्रतिलिटर दराने सहज उपलब्ध होत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. यावरून परिसरात डिझेलचा काळाबाजार सुरू असल्याचे



स्पष्ट होत असून प्रशासनाचे याकडे अक्षम्य दुर्लक्ष किंवा मूकसंमती असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

उन्हाचा वाढता पारा लक्षात घेता, डिझेलसाठी रांगेत उभे राहताना एखाद्या शेतकऱ्याच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून डिझेलचा काळाबाजार रोखावा, संबंधित दोषींवर कठोर कारवाई करावी आणि शेतकऱ्यांना तात्काळ डिझेल उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा शेतकऱ्यांच्या वतीने तहसील कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

यावेळी जयसिंग शेळके, नवनाथ गायकवाड, रवी लांडगे, संदीप पाचगे, गणेश शेवाळे, विनोद धापसे, सोनू इंगोले, मनोज बशिरे, बाबा शेळके यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते.

# भौतिकशास्त्र विभागातील ११ विद्यार्थ्यांच्या १९ पेटेंटला मान्यता

## डॉ. संजय ढोबळे यांच्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांनी मिळविले यश

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर** : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर भौतिकशास्त्र विभागातील एम.एससी.च्या ११ विद्यार्थ्यांनी एकूण १९ पेटेंट विभाग प्रमुख व वरिष्ठ प्राध्यापक डॉ. संजय जानराव ढोबळे यांच्या मार्गदर्शनात प्राप्त केले आहे. २०२५-२०२६ या शैक्षणिक सत्रात या सर्व १९ पेटेंटला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळविण्यात डॉ. संजय ढोबळे यांना यश प्राप्त झाले आहे.

एम.एससी. करीत असताना डॉ. संजय ढोबळे हे विद्यार्थ्यांना संशोधनाचे प्रशिक्षण देऊन वर्तमान सामाजिक समस्या व शैक्षणिकदृष्ट्या आवश्यक असलेल्या विषयावर विद्यार्थ्यांना संशोधन करून त्यांच्याकडून संशोधन पेपर, पेटेंट व परिषदेमध्ये संशोधन पत्र वाचनाचे कार्य मोठ्या उत्साहाने करतात. त्यामुळे भौतिकशास्त्र विभागाचे विद्यार्थी संशोधन करून विद्यापीठाला सर्वोच्च स्थानावर नेण्याचा प्रयत्न करीत असतात. संशोधनामध्ये आवड निर्माण झाली तर हेच विद्यार्थी पुढे पी.एचडी. करण्यासाठी पुढे येतात व देशाबाहेर पोस्ट डॉक्टरेटसाठी जातात. आतापर्यंत डॉ. ढोबळे यांनी एकूण १६ विद्यार्थ्यांना विदेशात पोस्ट डॉक्टरेटसाठी पाठविले आहे. यामध्ये त्यांच्यासोबत कार्य करणारे इतर संशोधक देखील आहेत. शैक्षणिक सत्र २०२४-२५ मध्ये देखील




एमएससीच्या १२ विद्यार्थ्यांच्या १६ पेटंट्सला मान्यता मिळाली होती.

शैक्षणिक सत्र २०२५-२६ मध्ये एम.एससी.च्या एकूण ११ विद्यार्थ्यांनी १९ पेटेंट साठी कार्य केले. यातून बऱ्याच विद्यार्थ्यांच्या पेटंट्सला मान्यता प्राप्त झाली आहे. एम. एस. सी. च्या प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांमध्ये हिमानी लांजेवार, चाहुल गायधने, गायत्री बरडे, ऋतिका गवळी, वनश्री डोनेकर, सेजल फाटे, सुमितकुमार पांडे, नयन रामगोणवार, वैष्णवी थोटे, सिद्धेश्वर नागपुरे व प्रियंका चरडे आदी विद्यार्थ्यांचा यामध्ये समावेश आहे. सिद्धेश्वर नागपुरे व प्रियंका चरडे यांनी एम.एस. सी. होताच संशोधन कार्य करण्याची आपली इच्छा व्यक्त केली आहे.

भौतिकशास्त्र विभागातील विद्यार्थी पेटेंटसाठी आपले कार्य करतात, हीच खऱ्या अर्थाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची चाहूल आहे. पदव्युत्तर पदवीसाठी प्रवेश घेऊन संशोधनामुळे येथील विद्यार्थी पुढे विदेशात देखील संशोधन कार्य करण्यासाठी जातात, ही विभागाची मोठी उपलब्धी असल्याचे डॉ. संजय ढोबळे यांनी सांगितले आहे.

भौतिकशास्त्र विभागातून एम.एससी.च्या विद्यार्थ्यांचे पेटेंट होतात व हा विभाग विद्यापीठात संशोधनासाठी अव्वल येतो, ही आनंदाची बाब आहे, असे सांगत माननीय कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर, प्र-कुलगुरु डॉ. अखिलेश पेशवे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी विद्यार्थी व मार्गदर्शक डॉ. संजय ढोबळे यांचे अभिनंदन केले आहे.

# रिसोडमध्ये राजर्षी शाहू मल्टीस्टेटचा भव्य ग्राहक मेळावा

## तहसीलदार सौ .प्रतीक्षाताई तेजनकर व ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती

**दैनिक युवक आधार**

**रिसोड रंजित ठाकुर तालुका प्रतिनिधी** : सामाजिक बांधिलकी, आर्थिक सक्षमीकरण आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रगतीचा ध्यास घेत कार्यरत असलेल्या राजर्षी शाहू मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी तर्फे रिसोड येथे भव्य ग्राहक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार, दिनांक २७ मे २०२६ रोजी सकाळी ९ वाजता दूरदर्शन केंद्राजवळ, गंगासदन, बस स्टँड रोड, रिसोड येथे हा बहुप्रतिक्षित मेळावा मोठ्या उत्साहात पार पडणार आहे.

या ग्राहक मेळाव्यामुळे रिसोड




शहरासह ग्रामीण भागातील नागरिक, महिला बचत गट, शेतकरी, छोटे व्यापारी तसेच युवकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली असून आर्थिक साक्षरता आणि बचतीचे महत्त्व जनतेपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जाणार आहे.

कार्यक्रमास रिसोडच्या तहसीलदार माननीय सौ. प्रतीक्षाताई तेजनकर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून रिसोडचे ठाणेदार माननीय श्री. रामेश्वरजी चव्हाण हे देखील विशेष उपस्थित राहणार आहेत. याशिवाय रिसोड येथील स्थानिक संचालक मंडळ, विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संदीप शेळके भूषविणार आहेत. तर मालती शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागातील सामान्य नागरिकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी विविध योजना, बचत उपक्रम, कर्ज सुविधा आणि स्वावलंबनाचे मार्ग उपलब्ध करून दिले जात असल्याचे आयोजकांनी सांगितले.

मेळाव्यात ग्राहकांना विविध आर्थिक योजनांची माहिती देण्यात येणार असून बचत, गुंतवणूक, महिला सक्षमीकरण, व्यवसायवृद्धी तसेच शेतकऱ्यांसाठी उपयुक्त योजना याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. वाढत्या आर्थिक स्पर्धेच्या काळात सर्वसामान्य माणसाला सक्षम बनविण्याचा प्रयत्न या उपक्रमातून होत असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विभागीय व्यवस्थापक गोविंद येवले तसेच रिसोड शाखा व्यवस्थापक अक्षय बोडखे हे विशेष परिश्रम घेत आहेत.

रिसोड परिसरातील नागरिकांनी या ग्राहक मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहून विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# हरवली आहे

**दैनिक युवक आधार**

**शिवाजी वाघमारे , पुणे प्रतिनिधी**

**शिर्डी :-**बर्डे वस्ती येथील सौ. ज्योती मछिंद्र पेठारे वय 25 वर्षे रा. बर्डे वस्ती पान मळा रोड शिर्डी ता. राहता जि. अहिल्यानगर

येथील राहत्या घरातून दि. 18/05/2026 सोमवारी सकाळी 5 वाजण्याच्या सुमारास घरातील कोणत्याही व्यक्तीला न सांगता अचानक घर सोडुन निघून गेल्या आहेत सोबत एक 6 महिन्याचे मुलगा लहान बाळ आहे सदरील महिला ही



सडपातळ सावळ्या रंगाची आहे सरळ नाक अंगावर काळ्या रंगाची साडी घातलेली आहे जर कोणाला अशा प्रकारची महिला आढळून आल्यास संपर्क साधावा त्या वक्तीला योग्य बक्षीस देण्यात येईल मोबाईल न.9765724642 सुशीला दगडू पेठारे बर्डे वस्ती पानमळा रोड, शिर्डी

# मॉर्निंग वॉकला गेलेल्या भारत बेहेरे यांना कारची धडक

## कारचा धडकेत त्यांचा जागीच मृत्यू

**दैनिक युवक आधार:**

**श्रीक्षेत्र माहूर प्रतिनिधी:सय्यद इसा** : माहूर शहरातील कपिलेश्वर धर्म शाळेचे संचालक भारत बेहेरे वय 60 वर्ष हे कपिलेश्वर धर्मशाळा ते न्यायालयापर्यंत दररोज मॉर्निंग वॉकला जातात आज सकाळी मॉर्निंग वॉक वरून परत येत असताना औरंगाबाद जिल्ह्यातील पीशोर येथील भाविकांच्या कार ने त्यांना हॉटेल षडानन समोर मागून जोराची धडक दिल्याने झालेल्या अपघातात भारत बेहेरे यांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना दि 26 रोजी सकाळी 6 वाजून 15 मिनिटांनी घडली आहे

मनमिळावू स्वभावाचे असलेले भारत बेहेरे हे दररोज सकाळी मॉर्निंग वाकला जात होते आज सकाळी मॉर्निंग वॉक वरून परत येत असताना षडानन हॉटेल समोर त्यांना पीशोर तालुका कन्नड जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथील भाविक धनाजी ज्ञानेश्वर देव वय 30 राहणार पीशोर हे स्वत: आपली कार क्रमांक M H 0 9 C J 7676 क्रियेटा या वाहनाने घरच्या मंडळींना घेऊन माहूर येथे दर्शनासाठी येत होते सकाळची वेळ असल्याने त्यांना समोर जात असलेले भारत बेहेरे दिसले नाही किंवा काही समजण्याआधी त्यांना मागून जोराची धडक बसली त्यामुळे ते रस्त्यावर पडल्याने 30 ते 35 फूट परफटत गेले त्यामुळे त्यांच्या डोक्याला



तोंडाला कमरेला जोराचा मार लागला त्यामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला

घटना पाहून जमलेल्या नागरिकांनी त्याच कार मध्ये भारत बेहेरे यांना त्याच कार मध्ये टाकून टाकून माहूरच्या ग्रामीण रुग्णालयात आणले असता येथे त्यांची प्राणज्योत मालवली होती चालक धनाजी देव यांना अटक करण्यात आली असून घटनेची नोंद माहूर पोलिसांनी घेतली असून तपास पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनी शरद घोडके पो उप नी बाबू जाधव पो का पवन राऊत करत आहेत भारत बेहेरे मनमिळाऊ स्वभावाचे असल्याने झालेल्या दुःखद घटनेमुळे हळहळ व्यक्त होत असून त्यांचे पश्चात दोन मुले सुना नातवंडे असा परिवार आहे.

# जेएनपीए मराठी माध्यम स्कूलच्या रूपाने साई संस्था (ट्रस्ट) शैक्षणिक संकुलाच्या शिरपेचात सन्मानाचा तुरा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : महाराष्ट्रात शैक्षणिक क्षेत्रात अग्रगण्य असणाऱ्या साई संस्था(ट्रस्ट) डोंबिवली यांच्या शैक्षणिक संकुलाच्या शिरपेचात २०२६-२७ या शैक्षणिक वर्षा पासून जेएनपीए मराठी माध्यम स्कूलच्या रूपाने सन्मानाचा तुरा खोवला गेला आहे.या विद्यालयाचा कारभार आत्ता साई संस्थेच्या हातात आला असल्यामुळे परिसरांतील पालक वर्गात आनंदाचे वातावरण असून उरण परिसरांतून जेएनपीएचे अध्यक्ष,सेक्रेटरी आणि या संस्थेचे अध्यक्ष नरसू पाटील यांच्यावर अभिनंदनाच वर्षाव होत आहे.

महाराष्ट्रात शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या साईसंस्था (ट्रस्ट) डोंबिवली या संस्थेच्या वतीने डोंबिवली येथे मराठी, गुजराथी, इंग्रजी माध्यमाच्या बरोबरीने गत वर्षी आणखीन एक स्कूल सुरु केले आहे. ही संस्था गेली १८ वर्षा पेक्षा अधिक काळ कार्यरत आहे,तर रायगड-माणगाव येथे गेली २४ वर्षा पेक्षा अधिक काळ इंग्रजी माध्यमाचे स्कूल कार्यरत आहे,या सर्व शैक्षणिक वर्षात या सर्व विद्यालयाने आपल्या शालांत परीक्षेचा निकाल १००



% टक्के लाऊन निकालाची यशस्वी परंपरा आजही राखून ठेवली आहे.मागील चार वर्षात संस्थेच्या वतीने उरण येथे नगराजशेठ सीबीएसई इंटरनॅशनल स्कूल व बरोबरीने कोल्हापूर गडहिंग्लज येथे इ.बी.गडकरी रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय कार्यरत असून गत वर्षी नरसू पाटील कॉलेज ऑफ फ़िजिओ थेरपी या आणखी एका नवीन वैद्यकीय महाविद्यालयाचा समावेश या साई संस्थेच्या शैक्षणिक संकुलात झालेला आहे.

साई संस्था(ट्रस्ट)ने शैक्षणिक क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतली असतानाच या सर्व शैक्षणिक बाबीची देशांतील नंबर वन असणाऱ्या जेएनपीए प्रशासनाने दखल घेत प्रकल्पग्रस्थ असणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचा सर्वांगीणविकास व्हावा हा उद्दात हेतू विद्यार्थ्यांचे पुढील शैक्षणिक भविष्य लक्षात घेऊन उरण येथील जेएनपीए वसाहत संकुलात असणाऱ्या जेएनपीए विद्यालयाच्या मराठी माध्यमाची धुरा साई संस्थेवर यंदाच्या २०२६-२७ शैक्षणिक वर्षा पासून टाकली आहे.याबाबतची ऑर्डर दि.३० एप्रिल २०२६ रोजी जेएनपीए प्रशासनाने संस्थेचे अध्यक्ष नरसू पाटील यांच्या कडे सपुर्द केली आहे.

या संदर्भात साई संस्थेचे (ट्रस्ट)चे अध्यक्ष नरसू पाटील यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की मी स्वतः शिक्षक असल्याने मला शैक्षणिक क्षेत्राची चांगली जाण आहे.जेएनपीएचे अध्यक्ष,सेक्रेटरी आणि प्रशासनाने संस्थेवर विश्वास दाखून शिक्षणाची मोठी जबाबदारी माझ्या संस्थेवर सोपविली आहे. तीपूर्ण करण्यास मी व संस्था कटिबद्ध राहून पूर्ण करू, येथील बहुसंख्य विद्यार्थी हे प्रकल्पग्रस्त आहेत त्यामुळे त्या विद्यार्थ्यांना पीएपीची सवलत मिळेल,साई संस्थेच्या वतीने चालू शैक्षणिक वर्षात कोणत्याही प्रकारे फी वाढ होणार नाही.विशेष म्हणजे सरकारकडून अनुदान मिळविण्यासाठी जेएनपीए प्रशासनाने संस्थेला परवानगी दिली आहे त्यामुळे शिक्षकांच्या वेतना मध्येही फरक पडेल व सर्व शिक्षक कायम स्वरूपी सुरक्षित राहतील त्याचप्रमाणे सरकारच्या निकषानूसार विध्यार्थ्यानाही मोफत शैक्षणिक सुविधा उपलब्ध होतील,आत्ता आपलाच कुटुंबांतील एक व्यक्ती आपलीच शाळा चालवीत आहे ही पालकांची भावना असल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती पासून सुरक्षतेपर्यंतचे प्रश्न सुटले असल्यामुळे पालक वर्गातही आनंदाचे वातावरण आहे. जेएनपीए प्रशासनाने संस्थेवर टाकलेला विश्वास पूर्ण करण्यासाठी संस्थेचे सर्व पदाधिकारी आणि मी वचन बद्ध राहीन असे साई संस्थेचे(ट्रस्ट) चे अध्यक्ष नरसू पाटील यांनी सांगितले.

# रिसोड पोलीस स्टेशनमध्ये शिवाजी शाळेतील एन.सी.सी. विद्यार्थ्यांना शस्त्राबद्दल माहिती

**दैनिक युवक आधार**

**रिसोड प्रतिनिधी.रणजितसिह. ठाकूर** : एन.सी.सी...(NCC) विद्यार्थ्यांना स्थानिक रिसोड पोलीस स्टेशनमध्ये शस्त्रास्त्रांविषयी (Weapons Training) माहिती रिसोड पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक श्री रामेश्वर चव्हाण व त्यांचे सहकारी यांनी श्री शिवाजी विद्यालय रिसोड येथील एन.सी.सी.कॅटेट यांना देण्यात आली.असे उपक्रम सामान्यतः पोलीस स्टेशन व्हिजिट



किंवा समुदाय पोलीसिंग (Community Policing) कार्यक्रमांचा भाग असतात.या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना खालील गोष्टींची माहिती देण्यात आली. त्यांमध्ये शस्त्रांची ओळख 22 रायफल, 7.62 mm SLR, AK-47, आणि पिस्तूल यांसारखी आधुनिक शस्त्रे कशी हाताळावीत. शस्त्रांची कार्यपद्धती ,बंदुकीची रचना, तिचे भाग (Assembly and disassembly), आणि गोळीबार कसा करावा याबद्दलचे प्रात्यक्षिक तसेच शस्त्रास्त्रांच्या वापरादरम्यान घ्यावयाच्या सुरक्षेच्या नियमांची माहिती व पोलीस कार्यप्रणाली गुन्हे अन्वेषण आणि रहदारी नियंत्रण (Traffic Control) याबद्दलची माहिती देण्यात आली. या उपक्रमादरम्यान विद्यालयाचे प्राचार्य श्री संजय देशमुख एन सी सी टी ओ प्राध्यापक अभिजीत देशमुख विद्यालयाचे कर्मचारी श्री दर्शन सरनाईक व श्री विलास सरनाईक यांची उपस्थिती होती.

या उपक्रमाबद्दल प्राचार्य श्री संजय देशमुख यांनी संस्थेच्या वतीने श्री रामेश्वर चव्हाण पोलीस निरीक्षक रिसोड यांचे आभार मानले.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# महाराष्ट्रात अनुसूचित जाती समन्वय अभियानास प्रारंभ

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** आम्ही संगतीत आणि पंगतीत सोबत बसत नाही हा दूरूभाव अनुसूचित जातीच्या विविध घटकांना खटकत असतो, मग आम्ही यांच्या जवळ गेलो तर रोटी बेटीची सोयरिक साधतील का ? तसेच रिपब्लिकन ऐक्याचे ग्रहण अजुन सुटले नसताना आमच्या फाटाफुटी मुळे उपवर्गिकरणाच्या चर्चेला बळ मिळत आहे. असे मत आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे यांनी केली ते त्यांच्या वाढदिवसानिमित्त अनुसूचित जाती समन्वय अभियानाच्या प्रारंभ करताना बोलत होते.




बागडे यांच्या निवासस्थानी मातंग समाजातील महिला कार्यकर्त्यांनी शुभेच्छा देण्यासाठी सम्राट अशोक सेनेचे अध्यक्ष रवी भाऊ शेंडे, माजी जिल्हा परिषद सदस्य दिनेश बनसोड, गर्जना संघटनेचे अध्यक्ष भाई महेश ठाकूर, आंरिमोचे नेते धर्माजी बागडे, ओबीसी नेते राजू पांजरे, राष्ट्रीय संघटक देवेंद्र बागडे, रिपाइं आठवले शहर अध्यक्ष विनोद थुल, सेवानिवृत्त वित्त लेखा अधिकारी म्हाडा चे जयदेव चिंवडे, मातंग मोर्चा चे नेते मनोहर इंगोले, चर्मकार समाजाचे नेते व सुप्रसिद्ध शायर तन्हा नागपुरी, आंरिमो नागपूर विभागिय अध्यक्ष प्रवीण आवळे, सामाजिक कार्यकर्ते गौतम तिरपुडे, संजय मोटघरे,सुधिर मोटघरे, हंसराज उरकुडे,माजी नगरसेवक अमर बागडे, युवा नेते सुरज ढोणे, पंकज पाटील, गौतम बागडे, सुदर्शन, वाल्मिकी मोर्चा चे नेते सुभाष बढेल, चरणदास गायकवाड,नरेश खन्ना, वैशाली तभाने, संगिता चंद्रिकापुरे, डॉ सुधा जनंबधू,जुलैखा बेगम रुबिना खान,सरिता थुल, अनिता थुल,भागनबाई मेश्राम, सुशिला जनंबादे, जयश्री मसराम यांनी शुभेच्छांचा वर्षाव केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रमेश दुपारे यांनी केले तर आभार प्रदर्शन पुण्यशील बोदिले यांनी केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अंतुल गंगापूरकर,भोजराज नंदागवळी अमोल बागडे यांनी केले.

# न्हावाशेवा ते JNPA: शेतकऱ्यांचा त्याग आणि कामगारांच्या घामातून उभारलेल्या 'जवाहरलाल नेहरू पोर्ट ऑथॉरिटी'चा 37 वा वर्धापन दिन!

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण / प्रतिनिधी :** भारतातील अग्रगण्य आणि सर्वात मोठे कंटेनर बंदर जवाहरलाल नेहरू पोर्ट ऑथॉरिटी आज आपल्या यशस्वी कामगिरीची ३७ वर्षे पूर्ण करत आहे. २६ मे १९८९ रोजी स्थापना झालेल्या या बंदराने गेल्या पावणेचार दशकांत भारताच्या सागरी व्यापाराची व्याख्या पूर्णपणे बदलून टाकली आहे. आज ३७ व्या वर्धापन दिनानिमित्त बंदराच्या ऐतिहासिक प्रवासाचा आणि देश उभारणीतील योगदानाचा गौरव केला जात आहे.



या या भव्य बंदराची उभारणी स्थानिक शेतकरी आणि कामगारांच्या मोठ्या त्यागावर झाली आहे .नवी मुंबई उरण परिसरातील स्थानिक शेतकरी आणि आगरी कोळी कराडी बांधवांनी देशाच्या विकासासाठी आपल्या पिढ्या-पिढ्यांची सुपीक शेत जमिनी आणि मिठागरे या बंदरांसाठी दिल्या आपल्या जमिनी आणि हक्काची शेती सोडून भूमिपुत्रांनी या बंदराच्या उभारणीला आणि विस्ताराला सहकार्य केले. बंदर उभारणीसाठी शेवा आणि शेवा कोळीवाडा या दोन गावे विस्थापित करण्यात आली.प्रकल्पबाधित म्हणून येथील स्थानिक लोकच पुढे या बंदरामध्ये विविध पदांवर कामगार म्हणून रुजू झाले. जे एनपीए बंदराला जागतिक उंचीवर नेण्यात रात्रंदिवस कष्ट करणाऱ्या येथील कामगारांच्या घामाचा आणि मेहनतीचा सर्वात मोठा वाटा आहे.

या बंदराचा इतिहास जितका देदीप्यमान आहे, तितकाच त्याच्या नावाचा प्रवासही रंजक आहे. सुरुवातीचे नाव 'न्हावाशेवा पोर्ट': या नावाने ओळखले जात होते. मुंबई बंदरावरील वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी या आधुनिक बंदराची पायाभरणी झाली होती 'JNPT' (जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट): २६ मे १९८९ रोजी जेव्हा या बंदराचे अधिकृत उद्घाटन झाले, तेव्हा देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या स्मरणार्थ याचे नामकरण 'जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट' (JNPT) असे करण्यात आले. तत्कालीन दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांच्या बंदराचे उद्घाटन झाले होते.अनेक दशके हे बंदर याच नावाने जागतिक स्तरावर प्रसिद्ध राहिले. बदलत्या काळानुसार आणि जागतिक व्यापार पद्धतीशी सुसंगत राहण्यासाठी भारत सरकारने मेजर पोर्ट अथॉरिटीज ॲक्ट २०२१ लागू केला. या अंतर्गत अधिक स्वायत्तता आणि व्यावसायिक निर्णय घेण्याचे अधिकार मिळाल्यामुळे नोव्हेंबर २०२१ मध्ये ट्रस्ट ऐवजी अधिकृतपणे जवाहरलाल नेहरू पोर्ट ऑथॉरिटी असे नवीन नाव देण्यात आले.

केवळ एक उपग्रह बंदर म्हणून सुरू झालेल्या या बंदराने जागतिक स्तरावर २३सावे स्थान पटकावले आहे. २०२६ मध्ये जे एन पी ए ८ दशलक्ष ट्युज कंटेनर हाताळणीचा ऐतिहासिक विक्रम नोंदवला आहे जागतिक बँकेच्या लॉजिस्टिक परफॉर्मन्स इंडेक्स मध्ये ही बंदराच्या वेगवान कामगिरीचे कौतुक झाले आहे.३७ व्या वर्षात पदार्पण करताना जे एनपीए देशातील पहिले शंभर टक्के लँडलाईड मॉडेलवर चालणारे प्रमुख बंदर बनले आहे. संपूर्ण डिजिटल आणि पेपरलेस कामकाजासह बंदराने सौर ऊर्जा आणि पर्यावरण पूरक उपक्रमांवर भर दिला असून विकासाच्या उद्दिष्ट ठेवले आहे.

आपल्या ३७ वर्षाच्या अनुभवाच्या जोरावर जे एनपीए आता डहाणू जवळील देशातील पहिल्या मेगा फोर्ट म्हणजे 'वाढवण बंदर' प्रकल्पाची उभारणी करत आहे .

हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर भारताचे नाव जागतिक सागरी व्यापारात सर्वोच्च स्थानी पोहोचेल. स्थानिक गावांच्या कुशीतून आणि शेतकऱ्यांच्या त्याग भूमीतून सुरू झालेला हा प्रवास आज जागतिक व्यापाराचा महामार्ग बनला आहे.

देशाच्या अर्थव्यवस्थेची जीवन वाहिनी असलेल्या जे एन पी ए ला आणि त्यासाठी कष्ट करणारे सर्व कामगार शेतकऱ्यांना ३७ सा व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा.


# सिमेंटच्या 'हिट आयलंड'मुळे शहरात पक्षी कोलमडले!

## सिल्लोडमध्ये उष्माघाताने बेशुद्ध पडलेल्या सुंदर 'एशियन टिट'सह ७ पक्ष्यांना जीवदान

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी :** सिल्लोड ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरातील सिमेंटचे रस्ते, घरं आणि इतर विकासकामे या सिमेंट वापरलेल्या ठिकाणी वातावरणातील उष्णतेपेक्षाही अधिक तीव्र गरम झळा खालून येतात. हा त्रास सहन करणे पक्ष्यांना अशक्य होत असल्याने, ग्रामीण भागापेक्षा शहरातील पक्षी 'हिट आयलंड'मुळे (सिमेंटची उष्णतेची बेटे) अधिक जायबंदी होत असल्याचे वास्तव समोर आले आहे. २०२६ चा लांबलेला उन्हाळा मानवासहित पक्षी व सर्वच वन्यजीव यांना घातक ठरला असून, तीव्र उन्हामुळे बऱ्याच झाडांना पालवी फुटणेही लांबणीवर पडले आहे. पक्ष्यांना याचा मोठा फटका बसताना दिसत असून वाढते तापमान आणि हवेतील आद्रता पक्षी, वन्यजीवांना मारक ठरत आहे.





येथील जैवविविधता संवर्धक, इजाग्रस्त वन्यजीव आणि पक्ष्यांवर उपचार करणारे डॉ. संतोष पाटील यांच्याकडे गेल्या १५ दिवसांत शहर व परिसरातील नागरिक उन्हाचा फटका बसून 'हिट स्ट्रोक' झालेले अनेक पक्षी घेऊन आले होते. डॉ. पाटील यांनी तातडीने केलेल्या उपचारांमुळे यातील ९ पैकी ७ पक्ष्यांना वाचविण्यात यश आले आहे.

**रंगद्रव्याचा तांत्रिक परिणाम**

"काळे रंग असणाऱ्या पक्ष्यांना हिट स्ट्रोकचा फटका अधिक बसतो; कारण काळा रंग हा उष्णता अधिक शोषतो. तर दुसरीकडे, पांढऱ्या रंगाचे पक्षी पंख व त्वचेत 'मेलानिन' रंगद्रव्याच्या अभावामुळे उन्हाने अधिक प्रभावित होतात," असे डॉ. पाटील यांनी स्पष्ट केले.

**'बल्गुली टोपीवाला' पक्ष्याला नवजीवन**

काही दिवसांआधी 'बल्गुली टोपीवाला' म्हणून ओळखला जाणारा 'एशियन टिट' प्रजातीचा सुंदर पक्षी उन्हामुळे बेशुद्ध पडलेला आढळून आला होता. डॉ. संतोष पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यावर तातडीने मध व क्षार संजीवनीची मात्रा देऊन आणि शरीरावर शीतल पाण्याचे हबकारे व स्प्रे करून, तसेच त्याचे पाय गार पाण्यात काही वेळ ठेवून त्यास नवं आयुष्य लाभले. हे सर्व पक्षी पूर्णपणे बरे झाल्यानंतर, त्यांना एमटीडीसीच्या (MTDC) मागील तलावाजवळ दिवस मावळतीला नैसर्गिक अधिवासात सुरक्षितपणे मुक्त करण्यात आले आहे.

**"वाढते तापमान आणि हवेतील आद्रता पक्षी, वन्यजीवांना मारक ठरत आहे. उन्हाच्या या तीव्र झळांपासून मुक्या प्राण्यांना वाचवण्यासाठी नागरिकांनी संवेदनशीलतेने पुढाकार घेणे गरजेचे आहे."**
**– डॉ. संतोष पाटील (अभिनव प्रतिष्ठान, सिल्लोड)**

**पक्ष्यांसाठी आपली जबाबदारी**

**सावलीत जलपात्र ठेवा: घर अथवा इमारतीवर मातीच्या भांड्यात स्वच्छ, गार पाणी सावली राहील अशा पद्धतीने ठेवावे. पाण्यात थोडे ग्लुकोज टाकावे आणि हे पाणी दररोज बदलावे.**

**खोलगट भांड्यांचा वापर: पक्ष्यांना फक्त पिण्याचे पाणी पुरेसे नसून, त्यांना शरीराचे तापमान नियंत्रित करण्यासाठी बसता येईल-डुबकी मारता येईल असे खोलगट जलपात्रही ठेवावे.**

**घरटी जपा, कृत्रिम निवारे बनवा: बरेचसे नागरिक घराजवळ पक्ष्यांची घरटी असली की ती काढून टाकतात. आधीच झाडे कमी आणि घरटी काढली तर निवाऱ्याअभावी पक्षी उन्हात सैरभैर होतात व हिट स्ट्रोकने मरण पावतात. म्हणून घरटी जपावीत व कृत्रिम घरटी घराजवळ बसवावीत.**

# गुगुळ पिंपरी ग्रामपंचायतीसमोर एकाच वेळी तीन उपोषण

**दैनिक युवक आधार**

**हिंगोली जिल्हा प्रतिनिधी प्रशांत टाकसाळ :** ग्रामपंचायत गुगुळ पिंपरी, तालुका सेनगाव, जिल्हा हिंगोली येथे सध्या अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली असून ग्रामपंचायत कार्यालयासमोर एकाच वेळी तीन उपोषण आंदोलन सुरू आहेत.

गावातील विविध मूलभूत प्रश्नांवर दीर्घकाळापासून दुर्लक्ष होत असल्यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

पाणीपुरवठा, रस्त्यांची दुरवस्था, स्वच्छतेचा अभाव तसेच विकासकामांमधील अनियमितता या प्रमुख कारणांमुळे ही परिस्थिती उद्भवली असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.ग्रामस्थांनी अनेक वेळा ग्रामपंचायत तसेच संबंधित प्रशासनाकडे लेखी व तोंडी तक्रारी करूनही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही.

या सततच्या दुर्लक्षामुळे संतप्त ग्रामस्थांनी उपोषणाचा मार्ग स्वीकारत प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.विशेष म्हणजे, एकाच ग्रामपंचायत कार्यालयासमोर तीन स्वतंत्र उपोषण सुरू असणे ही अत्यंत गंभीर बाब मानली जात आहे.या घटनेमुळे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून जबाबदारी निश्चित करण्याची मागणी जोर धरत आहे.



उपोषणस्थळी ग्रामस्थ, महिला व युवक मोठ्या संख्येने सहभागी होत असून वातावरण तणावपूर्ण झाले आहे.आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, त्यांच्या मागण्यांकडे तात्काळ लक्ष न दिल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल. प्रशासनाकडून अद्याप कोणतीही ठोस भूमिका समोर आलेली नसल्यामुळे ग्रामस्थांमध्ये असंतोष वाढत आहे.या पार्श्वभूमीवर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने हस्तक्षेप करून समस्यांचे निराकरण करावे, अशी मागणी होत आहे.अन्यथा परिस्थिती आणखी चिघळण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.ग्रामस्थांनी न्याय मिळेपर्यंत उपोषण सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला असून प्रशासनाला ही गंभीर परिस्थिती हाताळण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले आहे.

# ग्राम पंचायत अधिकारी सौ .संगीता माने यांच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे तळे पिंपळगाव ग्राम पंचायतीला तालुक्यात प्रथम क्रमांक

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) -** महाराष्ट्र शासनाच्या ग्राम विकास व पंचायतराज विभागाच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत पाटोदा तालुक्यातील तळे पिंपळगाव ग्राम पंचायतीने तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या यशामध्ये आमदार सुरेश आण्णा धस यांची महत्त्वाची भूमिका बजावली असून त्यांच्या प्रयत्नांमुळे व ग्राम पंचायतच्या ग्रामविकास अधिकारी सौ.संगीता दिगंबर माने यांच्या नियोजनबद्ध, दर्जेदार व कर्तव्यनिष्ठ कामकाजाचा मोठा वाटा असल्याची भावना ग्रामस्थांमधून व्यक्त होत असून ग्राम पंचायतच्या ग्राम विकास अधिकारी सौ.संगिता माने यांचे व सरपंच सौ.नेहा शशिकांत चौरे, उपसरपंच व सर्व ग्राम पंचायत सदस्य यांचे मोलाचे सहकार्य लाभले असून या मुळे ग्राम पंचायत अधिकारी सौ.माने, सरपंच सौ.नेहा चौरे व इतर सदस्य व गावकऱ्यांचे सर्वत्र कौतुक होत असून अनेकांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत. पाटोदा तालुक्यातील डोमरी येथील रहिवासी असलेल्या सौ.संगीता दिगंबर माने या गेल्या दहा वर्षांपासून तळे पिंपळगाव ग्राम पंचायतीत ग्राम पंचायत अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. त्या लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस यांचे स्विय सहाय्यक सोमीनाथ कोल्हे यांच्या भाची असून आपल्या प्रशासनातील कुशलता, शिस्तबद्ध कार्यपद्धती आणि जबाबदारीमुळे त्यांनी वेगळी ओळख निर्माण केली आहे.




महिला ग्राम पंचायत अधिकारी म्हणून कार्य करताना सौ.माने यांनी ग्राम पंचायतीचे प्रशासन अत्यंत प्रभावीपणे सांभाळले आहे. कार्यालयीन अभिलेखे, शासकीय नोंदी, विविध योजनांची माहिती, दप्तर व्यवस्था तसेच इतर रेकॉर्ड मेंटेनन्स अत्यंत चांगल्या व दर्जेदार पद्धतीने ठेवण्यात त्यांचा हातखंडा आहे. शासनाने ठरवून दिलेल्या विविध निकषांची प्रभावी अंमलबजावणी, ग्राम पंचायतीतील मूलभूत सुविधांवर दिलेला भर आणि प्रशासनातील पारदर्शकता या मुळेच तळे पिंपळगाव ग्राम पंचायतीची मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियानात तालुक्यात प्रथम क्रमांकासाठी निवड झाल्याचे सांगितले जात आहे. या यशामुळे ग्रामविकास अधिकारी सौ.संगीता दिगंबर माने यांचे सर्वत्र कौतुक होत असून विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. ग्रामस्थ, पदाधिकारी व मान्यवरांकडून त्यांच्या वर शुभेच्छांचा वर्षाव होत असून भविष्यातही अशाच उत्कृष्ट कार्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा कोकण विभागीय तालुकास्तरीय निकाल जाहीर

## भालावल गाव प्रथम ; किशोर माने यांची माहिती

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत कोकण विभागीय सावंतवाडी तालुकास्तरीय तपासणी व मूल्यांकन समितीने विविध ग्रामपंचायतींचे सखोल परीक्षण पूर्ण करून नुकताच निकाल जाहीर केला आहे. यामध्ये प्रथम क्रमांक सह १५ लाख रूपये पारितोषिक भालावल या ग्रामपंचायतीने पटकाविले आहे अशी माहिती मूल्यांकन समितीचे अध्यक्ष गटविकास अधिकारी किशोर माने,समितीचे सदस्य तथा पत्रकार संघाचे सचिव गजानन हगवणे यांनी दिली



मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत सावंतवाडी तालुकास्तरीय तपासणी व मूल्यांकन समितीने विविध ग्रामपंचायतींचे सखोल परीक्षण पूर्ण केले आहे. मुल्यांकन समितीचे अध्यक्ष गटविकास अधिकारी किशोर माने यांनी निकाल जाहीर केला. ग्रामविकास, स्वच्छता, पाणीपुरवठा जलव्यवस्थापन,लोकसहभाग, शाश्वत विकास तसेच शासन योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीच्या निकषांवर आधारित हे मूल्यांकन करण्यात आले.अध्यक्ष किशोर माने यांच्या मार्गदर्शनाखाली पत्रकार संघाचे सचिव गजानन हगवणे,विस्तार अधिकारी सुनील जगताप,प्रशासन विभागातील वरिष्ठ अधिकारी नितीन शिर्के व सागर दळवी यांनीही महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. सदर तपासणी प्रक्रिया २९ एप्रिलपासून सुरू करण्यात आली होती. समितीने गावागावांत प्रत्यक्ष भेटी देत अत्यंत अभ्यासू, वस्तुनिष्ठ व अचूक पद्धतीने तपासणी केली. ग्रामपंचायतींच्या नोंदी, विकासकामे,स्वच्छता उपक्रम,पाणी व्यवस्थापन,ग्रामस्थांचा सहभाग तसेच शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी यांची बारकाईने पाहणी करण्यात आली.या मूल्यांकन प्रक्रियेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींची यादी पुढीलप्रमाणे जाहीर करण्यात आली आहे :प्रथम क्रमांक,भालावल ग्रामपंचायत

द्वितीय क्रमांक,वेत्ये ग्रामपंचायत तर तृतीय क्रमांक,आसगाव ग्रामपंचायत उत्तेजनार्थ मळेवाड व निरवडे या ग्रामपंचायतींची निवड करण्यात आली आहे यामध्ये भालावल ग्रामपंचायतीने प्रथम क्रमांक पटकावत तालुक्यात मानाचा बहुमान मिळविला आहे.प्रथम क्रमांक प्राप्त ग्रामपंचायतीला १५ लाख रुपयांचे पारितोषिक देऊन गौरविण्यात येणार आहे.तसेच भालावल ग्रामपंचायतीची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाल्याने गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

समितीने केलेल्या पारदर्शक व काटेकोर तपासणीमुळे ग्रामपंचायतींमध्ये विकासकामांबाबत स्पर्धात्मक वातावरण निर्माण झाले असून गावांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.अभियानांतर्गत शासनाने निश्चित केलेल्या निकषांची प्रभावी अंमलबजावणी करणाऱ्या ग्रामपंचायतींना यामुळे प्रोत्साहन मिळणार आहे.

# पुणे जिल्ह्यात अमली पदार्थ विरोधी कारवाईची शेतकरी संघटनेची मागणी तीव्र

**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय** : पुणे जिल्ह्यातील तरुणाई मोठ्या प्रमाणावर अमली पदार्थांच्या विळख्यात अडकत चालली असून त्याचा परिणाम म्हणून गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे. गांजा,भांग,चरस, हेरॉईन,ब्राऊन शुगर, मेथाम्फेटामाइन,अफू आणि कोकेन यांसारख्या पदार्थांचा वापर शहरी तसेच ग्रामीण भागात वाढत आहे. शाळा,कॉलेज,तरुण मंडळे, अवैध दारू दुकाने व निवडक पान टपऱ्या ही विक्रीची प्रमुख ठिकाणे बनली आहेत. विशेषतः १५ ते १६ वर्षे वयोगटातील तरुण मोठ्या प्रमाणावर या व्यसनात



अडकत चालली असल्याची माहिती प्रदेशअध्यक्ष अमर कदम व सहकारी यांनी भेट देऊन माहिती देण्यात आली. जिल्ह्यातील खून,चोरी, दरोडे,अपहरण,गँगवार यामध्ये अमली पदार्थांचे सेवन मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे निदर्शनास आले आहे.पोलिस यंत्रणेला विक्रेत्यांची माहिती असूनही कारवाई न केल्यामुळे जनतेत नाराजी वाढली आहे.

जिल्हा पोलिस प्रमुखांना शेतकरी संघटनेने दिलेल्या निवेदनात आवाहन केले आहे की,"सद्रक्षणाय खल निग्रहणाय"या ब्रीदवाक्यानुसार पोलिसांनी कठोर कारवाई करून अमली पदार्थ विक्रेत्यांचे समूळ उच्चाटन करावे.अन्यथा एका महिन्यात कारवाई झाली नाही तर विद्यार्थी व पालकांचा विराट मोर्चा जिल्हा पोलिस प्रमुख कार्यालयावर काढण्यात येईल,असा इशारा शेतकरी संघटना यांनी देण्यात आला आहे

# शिळ - दिवा रस्ता रुंदणी करणातील वृक्षतोड आणि पुनरोपणातील विलंब माजी नगरसेवक हिरा पाटील आक्रमक

**दैनिक युवक आधार**

**कल्याण रमेश राऊत,ग्रामिण प्रतिनिधी** : दिवा -शिळ रस्ता रुंदणी करण्याच्या कामात मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करण्यात आली यामध्ये सुमारे २८३ झाडे तोडण्यात आली होती वृक्ष प्राधिकरणाच्या नियमानुसार ३७३५ झाडांचे पुनर्रोपण करायचे होते महाराष्ट्र नागरिक क्षेत्र झाडांचे संरक्षण व संवर्धन अधिनियम १९७५ मधील कलम(८)(५) अ नुसार झाडे तोडल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत पुनर्रोपण करणे आवश्यक असते पण झाडे तोडून दोन



वर्ष उलटून गेली असताना सुद्धा अजून पर्यंत झाडे लावले नसल्याचे निदर्शनास आले आहे.

त्याचप्रमाणे २८३ झाडे तोडली असताना अधिकृत नोंदी मध्ये २७१ झाडे तोडल्याचे दाखवण्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. नियमबाह्य वृक्षतोड आणि पुनर लागवडीस विलंब यामुळे पर्यावरणाचे नुकसान झाले आहे या प्रकरणातील जबाबदार अधिकारी श्री दीपक माने आणि ठेकेदार यांच्यावर त्वरित शिस्तभंगाची आणि कायदेशीर कारवाई

## पत्रद्वारे आयुक्तांकडे तक्रार दाखल

करून बडतर्फ करण्याची मागणी करण्यात आली आहे तसेच नियमानुसार झाडांचे जिओ टॅगिंग आणि सर्वायवल ऑडिटची माहिती सार्वजनिक करण्याची मागणी सुद्धा करण्यात आली आहे

याप्रसंगी माजी नगरसेवक श्री.हिरा सिताराम पाटील,दिवा शहर प्रमुख श्री. सचिन पाटील आगरी समाज प्रतिष्ठानचे अध्यक्ष विलास पाटील, श्री.जितेंद्र शांताराम पावशे, श्री.अमोल केंद्रे आणि कु.किरण हिरा पाटील इत्यादी पर्यावरण प्रेमी उपस्थित होते यावेळी माननीय आयुक्तांना सर्व वेळेवर पर्यावरण प्रेमींनी वृक्षाचे रोपटे भेट देऊन वृक्ष लागवड लवकरात लवकर करावी याचे स्मरण करुन देण्यात आले.

विकासाच्या नावाखाली होणारा पर्यावरणाचा विनाश आणि कायद्याचे उल्लंघन आम्ही खपून घेणार नाही असा इशारा देऊन सर्व नागरिकांनी पर्यावरणाच्या संरक्षणासाठी एकत्र येण्याचे आव्हान ही करण्यात आले आहे.

# मंत्रालयात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे डॉ. हर्षदीप कांबळे यांनी दिली अधिकारी, कर्मचारी व मुंबईकरांना तंबाखूमुक्तीची शपथ

**दैनिक युवक आधार**

**मुंबई ( नासिकेत पानसरे )**:"जागतिक तंबाखू विरोधी दिन" निमित्ताने सामाजिक न्याय विभाग व नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार २६ मे २०२६ रोजी या प्रचार कार्यक्रमाचे आयोजन मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगणात करण्यात आले होते.

याप्रसंगी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, समाजकल्याण विभागाचे आयुक्त दिपा मुधोळ यांच्या हस्ते सदर भव्य व्यसनमुक्ती पोस्टर्स प्रदर्शनीचे उद्घाटन करण्यात आले. त्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना मुंबईकरांना संदेश दिला की, ३१ मे जागतिक तंबाखू विरोधी दिन या दिवसाचे महत्त्व आज मोठ्या स्वरुपात आहे. जागतिक आरोग्य संघटनेने इशारा दिला आहे की, जर तंबाखूचे व्यसन थांबविले नाही तर सन २०२०ते २०३० पर्यंत जगातील सुमारे शंभर कोटी लोक तंबाखू पासून होणाऱ्या रोगांमुळे मृत्यू पावतील. त्यामध्ये २० ते ३० वर्षे वयोगटातील ४० टक्के लोक असू शकतात. म्हणून या आयोजनात सर्वांनी सहभागी होऊन स्वतःला तंबाखू पासून दूर ठेवण्याची शपथ उपस्थित आधिकारी व कर्मचारी यांना व्यसनमुक्तीची शपथ त्यांनी दिली. महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे ज्यांनी २०११ साली व्यसनमुक्तीचे धोरण बनविले आहे. महाराष्ट्र सरकारने या निमित्ताने व्यसनमुक्त महाराष्ट्र च्या दिशेने पाऊल उचलावे असे आवाहन नशाबंदी मंडळाचे चिटणीस अमोल स. भा. मडामे यांनी केले. तसेच येणाऱ्या वर्षात शाळा, महाविद्यालये, हॉस्पिटल्स, धार्मिक स्थळे यांच्या १०० मीटर पासून तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ विक्री बंद व्हावी या संदर्भात मोठ्या प्रमाणात जनजागृती कायदा अंमलबजावणीची मोहीम नगरपालिका, नगरपरिषद यामध्ये मोहीम राबविण्यात येईल अशी माहिती मंडळाच्या वतीने चिटणीस / मुख्य संघटक अमोल स. भा. मडामे यांनी दिली. समाजकल्याण विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांच्या हस्ते कल्याणयात्रा-व्यसनमुक्तीच्या गाथा या मासिकाच्या मे २०२६ या अंकाचे प्रकाशन करण्यात आले. आयुक्त दिपा मुधोळ - मुंडे यांच्या हस्ते तंबाखूमुक्तीच्या पोस्टर्स चे प्रकाशन करण्यात आले तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांच्या हस्ते उपस्थिततांना तंबाखूमुक्तीची शपथ देण्यात आली. सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे व सामाजिक विभागाचे आयुक्त दिपा मुधोळ यांनी स्टॉल ला भेट देऊन संस्थेचे स्वागत केले. ही प्रदर्शनी बघण्यासाठी येणारे कर्मचारी, अधिकारी व मुंबईकर यांचे लक्ष वेधुन घेऊन सर्वांना तंबाखूला नाही म्हणा असे संदेश देत होते. सदर कार्यक्रमाला नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य, सलाम मुंबई फाऊंडेशन, नरोत्तम सक्सेरिया फाऊंडेशन, सलाम बॉम्बे फाऊंडेशन, सेंट जॉर्ज हॉस्पिटल, के इ एम हॉस्पिटल, भरडावाडी हॉस्पिटल, मराठवाडा ग्रामीण विकास, अन्वय व्यसनमुक्ती केंद्र, वाशी, प्रजापिता ब्रम्हकुमारीज, सपोर्ट संस्था मुंबई या संस्थांनी सहभाग घेऊन कार्यक्रमात पोस्टर प्रदर्शनीचे आयोजन करून व्यसनमुक्तीचा संदेश दिला. तंबाखूजन्य कायद्याची माहिती दर्शविणारे कटआऊट, प्रदर्शनी, पोस्टर्स, पत्रकांच्या माध्यमातून तंबाखूजन्य पदार्थ व विक्री कायदा २००३ चा प्रचार, प्रसार व अंमलबजावणीसाठी आयोजित या कार्यक्रमात उपस्थित सर्वांनी आपला सहभाग नोंदवत तंबाखू मतलब खल्लास तंबाखू मुक्त मुंबई महाराष्ट्र चा नारा देत तंबाखूजन्य पदार्थ पासून दूर राहण्याचा संकल्प केला.

# ईपीआर फाउंडेशनच्या वतीने खा खेळा-वाचा" जनजागृती अभियानांतर्गत शाळेला सदिच्छा भेट



**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : लक्ष्मीबाई मारुतीराव बांदल स्कूल, येथे ईपीआर फाउंडेशनच्या संस्थापक अपर्णा शहा संस्थापीत "खा-खेळा-वाचा" जनजागृती अभियानांतर्गत सदिच्छा भेट आयोजित करण्यात आली. भारताला निरोगी आणि आनंदी राष्ट्र बनवणे या हेतू विद्यार्थ्यांना "खा विचारपूर्वक, खेळा उत्साहपूर्वक आणि वाचा उत्स्फूर्तपणे" या संकल्पनेविषयी मार्गदर्शन करण्यास अभियानाचे राजदूत तेथे पोहोचले. या कार्यक्रमात मुलांना योग्य आहाराचे महत्त्व, खेळाचे फायदे आणि वाचनाची सवय याबाबत माहिती देण्यात आली. तसेच कलाकृती आणि पीपीटीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आकर्षक पद्धतीने मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनीही उत्साहाने सहभाग घेत कार्यक्रमाचा आनंद लुटला. मुलांना स्वतः आत्मपरीक्षण करण्यासाठी डायरी वाटप देखील करण्यात आले, विद्यार्थी दैनंदिनी या डायरीचा वापर करून आपल्या सवयींना चांगल्या सवयी मध्ये रूपांतरित करण्यास नक्कीच मदत होईल.शिक्षकांनी देखील कार्यक्रमाला उत्स्फूर्त असा प्रतिसाद दिला, काळाचा आणि विद्यार्थ्यांचा हा अत्यंत गरजेचा आणि महत्वाचा विषय आहे असे त्यांनी नमूद केले

# शिवसेना (उबाठा) पक्षाचे जिल्हाप्रमुख दिपक निकम यांच्या मार्गदर्शनाखाली आढावा बैठक संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या खांदा कॉलनी शहर शाखेत आयोजित आढावा बैठक आणि स्वागत समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी रायगड जिल्हाप्रमुख दीपक निकम यांचा उपमानगर संघटक शिवाजी दांगट यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाला शिवसेनेचे सहसंपर्कप्रमुख अनिल चव्हाण, रायगड जिल्हाप्रमुख दीपक निकम, उपजिल्हाप्रमुख रामदास दादा पाटील, पनवेल महानगर प्रमुख समाधान काशीद यांचे खांदा कॉलनी




शहर शाखेतर्फे भव्य स्वागत करण्यात आले. शिवसैनिकांच्या उत्साहात आणि जल्लोषात हा कार्यक्रम मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला.

बैठकीदरम्यान संघटनात्मक आढावा घेण्यात आला तसेच आगामी राजकीय आणि संघटनात्मक नियोजनावर चर्चा करण्यात आली. यावेळी उपमानगर प्रमुख रामदास गोंधळी, उपशहर प्रमुख मामुलकर, होटकर, शहर प्रमुख सदानंद शिर्के, लीलाधर भोईर, संतोष जाधव, परब, संजीव गमरे, शिवाजी बंडगर, घाडगे मावशी यांच्यासह महिला पदाधिकारी, कार्यकर्ते आणि अनेक शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला असून उपस्थित शिवसैनिकांनी पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखा उत्तर नांदेड यांच्या वतीने पाच दिवसीय बाल संस्कार शिबिरास प्रारंभ

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या खांदा कॉलनी शहर शाखेत आयोजित आढावा बैठक आणि स्वागत समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी रायगड जिल्हाप्रमुख दीपक निकम यांचा उपमानगर संघटक शिवाजी दांगट यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला शिवसेनेचे सहसंपर्कप्रमुख अनिल चव्हाण, रायगड जिल्हाप्रमुख दीपक निकम, उपजिल्हाप्रमुख रामदास दादा पाटील, पनवेल महानगर प्रमुख समाधान काशीद यांचे खांदा कॉलनी शहर शाखेतर्फे भव्य स्वागत करण्यात आले. शिवसैनिकांच्या



उत्साहात आणि जल्लोषात हा कार्यक्रम मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला. बैठकीदरम्यान संघटनात्मक आढावा घेण्यात आला तसेच आगामी राजकीय आणि संघटनात्मक नियोजनावर चर्चा करण्यात आली. यावेळी उपमानगर प्रमुख रामदास गोंधळी, उपशहर प्रमुख मामुलकर, होटकर, शहर प्रमुख सदानंद शिर्के, लीलाधर भोईर, संतोष जाधव, परब, संजीव गमरे, शिवाजी बंडगर, घाडगे मावशी यांच्यासह महिला पदाधिकारी, कार्यकर्ते आणि अनेक शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महेंद्रशेठ घरत हे दिलेला शब्द पाळणारे नेते! उरण-पनवेल प्रीमियर लिगच्या आयोजकांचे मत

## गौतमी पाटीलने आपल्या अदाकारीने रसिकांना जिंकले!

**दैनिक युवक आधार**

**उलवे, प्रतिनिधी** : राधेय कला क्रीडा सांस्कृतिक मंडळ चिर्ले आयोजित उरण-पनवेल प्रीमिअर स्पर्धेच्या फायनलला रविवारी (ता. २३) आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत उपस्थित होते. त्यांच्या हस्ते सुप्रसिद्ध नृत्यांगना गौतमी पाटील यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी रसिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात महेंद्रशेठ घरत आणि गौतमी पाटील यांचे स्वागत केले. यावेळी महेंद्रशेठ घरत म्हणाले, "मी कलेवर आणि कलाकारांवर प्रेम करणारा माणूस आहे. कलाकारांना प्रोत्साहन देणे, हे माझे कर्तव्य मानतो. त्यामुळे चिर्ले येथील तरुण 'सुखकर्ता' बंगल्यावर आले होते. त्यांनी माझ्याकडे आमच्या प्रीमियर लिगला आम्ही गौतमी पाटील यांना आणत आहोत. येथील




रसिकांना आणि क्रीडाप्रेमींना सुप्रसिद्ध नृत्यांगना गौतमी पाटील यांच्या नृत्याचा आनंद द्यायचा आहे. त्यामुळे तुम्ही प्रायोजकत्व स्वीकारावे, अशी विनंती केली. त्या विनंतीला मान देऊन मी उरण-पनवेल प्रीमियर लिगचे प्रायोजकत्व स्वीकारले. कलाकारांना प्रोत्साहन आणि स्थानिक तरुणांच्या उदात्त भावना लक्षात घेतल्या. क्रिकेटचा मी नुसता चाहता नाही, स्वतः भरपूर खेळतो."

"महेंद्रशेठ घरत यांनी दिलेला शब्द पाळला. असा शब्दाचा पक्का राजकीय पटलावर एकच नेता आहे तो म्हणजे महेंद्रशेठ घरत," अशा भावना आयोजकांनी यावेळी व्यक्त केल्या. उरण-पनवेल प्रीमियर लिगचे आयोजक दीपक पाटील, संतोष पाटील आणि त्यांच्या टीमने शाल, सन्मानचिन्ह देऊन महेंद्रशेठ घरत यांचा यथोचित सत्कार केला. यावेळी हजारो क्रिकेटप्रेमींनी महेंद्रशेठ जिंदाबाद, अशा घोषणांनी क्रिकेट मैदान दणाणून सोडले. यावेळी परिसरातील इतरही अनेक मान्यवर उपस्थित होते.

# खांदेश्वर पोलिस स्टेशनची प्रभावी कामगिरी काही तासात चोरट्यांना अटक

## खांदा कॉलनी नागरिकांनी मानले आभार

**दैनिक युवक आधार**

**खांदा कॉलनी प्रतिनिधी** : खांदा कॉलनी परिसरात गेले काही दिवस अनेक चोरीच्या घटना घडल्या महिलाचे दागिने चोरणे तसेच घर फोडीच्या प्रमाणात वाढ झाली होती या प्रकरणाची दखल घेत नगरसेविका सिताताई पाटील यांनी खादेश्वर पोलिस स्टेशन परिसरात चोरीच्या घटनेत वाढ झाल्याने या परिसरात बीट मार्शलची संख्या वाढवावी असे निवेदन एका पत्राद्वारे खांदेश्वर पोलिस स्टेशनला दिले होते उन्हाळी सुट्टीत अनेक जण रूम बंद करून गावी गेल्याने चोरटे या संधीचा फायदा घेऊन घर फोंड्या करतात तसेच खांदा कॉलनीत लग्नाचे हॉल मोठ्या संख्येने असल्याने या परिसरात दुपारी 12 ते 4 या वेळेत बीट




मार्शल वाढवून नागरिकांना सुरक्षा प्राप्त करून द्यावी अशी मागणी नगरसेविका सिताताई पाटील यांनी खांदेश्वर पोलिस स्टेशनला नागरीकांच्या वतीने केली होती या मागणीची दखल घेत खांदेश्वर पोलिस स्टेशनने बीट मार्शल संख्या देखील वाढवलीच परंतु काही तासात खांदेश्वर पोलिस स्टेशन परिसरात चोरी केलेल्या चोरट्यांना अटक केली याची माहिती देण्यासाठी खांदेश्वर पोलिस स्टेशन वरिष्ठ निरीक्षक स्मिता ढाकणे यांनी नगरसेविका सिताताई पाटील व नागरिकांना पाचारण केले होते यावेळी त्यांनी सी सी टिव्ही आधारे चोरट्यांना कसे जेरबंद केले याची माहिती दिली हे सर्व बघून खांदेश्वर पोलिस स्टेशनच्या या प्रभावी कामगिरीचे नगरसेविका सिताताई पाटील यांनी कौतुक केले व त्यांनी या वेळी नागरिकांच्या वतीने खांदेश्वर पोलिस स्टेशनचे आभार मानले.

# बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर, नेरळ पोलिसांची विशेष मोहीम

**दैनिक युवक आधार**

**ता कर्जत, वैभव गायकवाड** : बुधवार दिनांक २७ मे रोजी बकरी ईद हा मुस्लिम बांधवांचा महत्वाचा सण आहे. सर्व ठिकाणी या सणानिमित्त उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण असणार आहे. तरी खबरदारी म्हणून व कोणताही सामाजिक ताण तणाव वाढू नये या कारणास्तव नेरळ पोलिसांमार्फत विशेष मोहीम राबवण्यात आली.या विशेष मोहिमेअंतर्गत कर्जत तालुक्याचे डी.वाय.एस. पी. श्री. राहुल गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली तसेच नेरळ पोलीस ठाणे मधील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राहुल वरोटे यांच्या निरीक्षणात सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. भास्कर गच्चे व इतर सर्व सहकारी यांनी नेरळ मधील प्रत्येक सोसायटी मध्ये जाऊन तेथील सर्व मुस्लिम




बांधवांना कायद्यानुसार नेमून दिलेल्या चौकटीत बकरी ईद साजरी करण्याचे निर्देश दिले आहे. प्रत्येक सोसायटी मध्ये सर्व धर्मीय व जातीय लोकं वास्तव्यास असतात त्यांच्या कोणत्याही भावनांना धक्का लागू नये यासाठी खबरदारी बाळगण्याचेही निर्देश दिले. समाजामध्ये एकोपा आणि बंधुत्व टिकून राहावे यासाठी महाराष्ट्र पोलीस नेहमीच प्रयत्नशील आहे असेही यावेळी उपस्थिती अधिकारी यांनी संदेश दिला.नेरळ पोलिसांची ही खबरदारी वाखाणण्याजोगी नक्कीच आहे. त्यामुळे सर्व जणांकडून नेरळ पोलिसांचे विशेष आभार व्यक्त केले जात आहेत.

# रेवदंडा समुद्रकिनाऱ्यावर शेवटी उन्हाळी गर्दी; परंतु उष्णतेनं व सेवा कुटकळीनं चिंता कायम

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी** : रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील रेवदंडा समुद्रकिनारा आणि इतर जवळची किनारे हा आठवडा परतीचा दिवस ठरले मे महिन्याच्या अखेरच्या टप्प्यावर समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांची गर्दी अचानक वाढली आणि किनाऱ्यांनी पुन्हा जीवंतपणा घेतला. मात्र या आनंदावर उष्णता, वाढती सेवा-मूल्ये आणि वाहतूककोंडी यांचे सावट अजूनही आहे.

**रेवदंड्यातील दृष्य**

समुद्रकिनाऱ्यावर विविध वयोगटातील कुटुंबे, तरुणी, विद्यार्थी आणि मुंबई-पुणे दिशेने निघालेली लोकसंख्या रंगून दिसली. बालकांनी वाळू महाल बनवून, तर तरुणांनी किनाऱ्यावर फोटो आणि जलक्रीडा अनुभवताना उत्साह दिसला. किनाऱ्यावर स्थानिक हॉटेल, खाद्यपदार्थ विक्रेते आणि किरकोळ दुकाने व्यस्त होती; पर्यटनाचे स्थानिक आर्थिक सरोवर पुन्हा उंचावले असे जाणवले.

**उष्णतेचा परिणाम आणि मागील तामसिक काळाची चिकाटी**

मे महिन्यातील तिहेरी संकट वाढता तापमान, इंधनदरवाढ आणि एलपीजी पुरवठ्यातील तणाव यांमुळे उन्हाळी हंगाम सुरुवातीला मंदावला होता. मेच्या पहिल्या तीन आठवड्यात गतवर्षीची गर्दी नक्कीच दिसली नाही.

रेवदंडा क्षेत्रात उष्ण आर्द्र हवामानामुळे उकाडा तीव्र अनेक पर्यटक, विशेषतः वृद्ध व लहान मुलं, वेळेवर वाढीव सावली, बर्फाचे पेय आणि पाण्याची गरज याबाबतीत तक्रार करीत होते.

**वाहतूक-तणाव आणि रस्त्यांचे वास्तव्य**

रेवदंडा, चौल, बागमळा मार्गावर



आणि अलिबाग ते मुरुड रस्त्यावर रस्ता रुंदीकरणामुळे तसेच संथगतीने चालणारे रोडची कामांमुळे ट्रॅफिक जामचे वातावरण सातत्याने निर्माण होते.

विशेषतः मे महिन्यातील शाळा कॉलेज सुट्टीमुळे सकाळी व संध्याकाळी, प्रवासी गर्दीमुळे रस्ते आणि रस्त्यांवरील सार्वजनिक वाहने हिलणखिलणीत दिसली. काही वेळा पोलीसही वाहतूक कोंडी सोडवण्यात संघर्ष करताना आढळले.

स्थानिकांकडून आणि पर्यटकांकडून "ठराविक मार्गांवर तात्पुरती वाहतुकीची व्यवस्था" व "रस्ता दुरुस्ती वेळी जागेत संपवावी" अशी मागणी वाढली आहे.

**पर्यटनवर्गीय सेवा व खर्चात वाढ**

पेट्रोल-डिझेल दरवाढ, एलपीजी पुरवठ्याचे ताण आणि जागतिक आर्थिक अनिश्चिततेचे परिणाम स्थानिक हॉटेल्स, प्रवासी सेवा व जलक्रीडा व्यवसायांवर पडले आहेत.

अनेक छोटे व्यवसायिकांनी सेवांचे दर वाढवले; परिणामी कुटुंबीयांसाठी पूर्ण एक दिवसच्या बाहेरच्या किमती वाढल्याने काही पर्यटक कमी प्रमाणात प्रवास करत असल्याचे निरीक्षण आढळले.

**जलक्रीडा आणि सार्वजनिक निर्बंध**

जिल्ह्याच्या प्रशासनाने 26 मेपासून 31 ऑगस्टपर्यंत जलवाहतूक व किनाऱ्यांवरील सॅरासिलिंग, बनाना राईड, स्पीड बोटी अशा साहसी खेळांवर तात्त्विक बंदी लागू केली आहे. या बंदीमुळे जलक्रीडा व्यवसायांवर थेट परिणाम होणार आहे आणि स्थानिकांना आर्थिक आव्हानांना सामोरे जावे लागेल.प्रशासनाने बंदीबाबतचे कारण सुरक्षेशी संबंधित जाहीर केले असल्याचे अधिकाऱ्यांचे वक्तव्य प्राप्त झाले आहे; परंतु अनेक सेवाप्रदाते व पर्यटक याबाबतीत असंतोष व्यक्त करत आहेत.

**स्थानीय प्रतिक्रिया आणि उपाययोजना**

पर्यटक आणि स्थानिकांनी वाहतूक व्यवस्थापन सुधारण्याची, किनाऱ्यांवर थंड पिण्याचे पाणी आणि शेडसारख्या सुविधा वाढवण्याची मागणी केली आहे.

पर्यटन व्यवसायिकांचे म्हणणे "दर वाढले तरी सेवा सुधारल्याशिवाय दीर्घकालीन पर्यटक आकर्षण टिकत नाही" त्यामुळे दर्जेदार सुविधा आणि आर्थिक दर्जाचा समतोल राखणे आवश्यक आहे.

प्रशासन आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांच्यातील समन्वयाने रस्त्यांवरील कामांचे वेळापत्रक पर्यटक हंगामाच्या बाहेर ठेवण्याचे आणि पर्वतीय-किनाऱ्यांवरील आपत्कालीन आरोग्य व ताण-निवारक सुविधा वाढवण्याचे सुचवले जात आहे.

**निष्कर्ष**

रेवदंडा आणि परिसरातील किनाऱ्यांवर मे महिन्याच्या शेवटी झालेली गर्दी दाखवते की स्थानिक पर्यटनाची मागणी अजून जिवंत आहे; परंतु वाढती उष्णता, सेवा-किंमत वाढ आणि वाहतूकबाधा या तिघांचा समन्वय नसल्यास पुढील हंगामात अधिक धोके निर्माण होऊ शकतात. प्रशासकीय नियोजन, स्थानिक व्यवसायांचे सुसंवाद आणि पर्यटकांसाठी सुलभ सुविधा या तिन्ही बाबींवर लक्ष दिले तरच रायगड जिल्ह्याच्या समुद्रकिनाऱ्यांचा दीर्घकालीन पर्यटनाचा लाभ टिकवता येईल

# उमेश दळवी बीड हत्याकांड प्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करावी

## मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हाधिकारी कार्यालया समोर निदर्शने

**दैनिक युवक आधार:**

**श्रीक्षेत्र माहूर गड प्रतिनिधी/ सय्यद इसा:** बीड शहरातील बालेपीर परिसरात मातंग समाजातील मजूर उमेश दळवी यांची दारू दुकानदाराने निर्घृण हत्या केली आहे.

अत्यंत गरीब कुटुंबातील उमेश हा मजुरी करून कुटुंबातील सदस्यांचा उदरनिर्वाह करीत होता. उमेश दळवी यांच्या मारेकऱ्यांना कठोरात कठोर शिक्षा व्हावी या मागणी साठी नांदेड जिल्हाधिकारी कार्यालया समोर निदर्शने करण्यात आली.निवेदनाच्या प्रति ना.देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री तथा गृहमंत्री,मंत्रालय,महाराष्ट्र राज्य मुंबई आणि जिल्हाधिकारी नांदेड यांना देण्यात आल्या.मातंग समाजातील उमेश नवनाथ दळवी यांची बीड शहरातील बालेपीर परिसरात निर्घृन हत्या केली असून दोषींना तात्काळ अटक करून कठोरात कठोर कारवाई करावी या मागणी साठी २६ मे रोजी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालया समोर निदर्शने करून निवेदन देण्यात आले आहे.बीड शहरातील शिवाजीनगर पोलीस स्टेशन हदद्दीत अवैध दारू विक्रीच्या दुकानात उमेश दळवी मजूर म्हणून कामाला होता.

सदरील घटना २३ मे च्या रात्री घडली.रात्री ८ वाजण्याच्या सुमारास




उमेश दळवी यांस मारहाण सुरू झाली. उमेशने पत्नीला फोन करून घरी सांगितले की, "मला इथे मारणार आहेत." रात्री ३ वाजता दुकानदाराने पत्नीला फोन करून "तब्येत बिघडली, रुग्णालयात नेले" असे सांगितले. नातेवाईक रग्णालयात गेले असता तोपर्यंत उमेशचा मृत्यू झाला होता. मारहाण पद्धत संतोष देशमुख हत्ये प्रमाणे आहे.दोरीने बांधून बेदम मारहाण. शरीरावर गंभीर जखमा, खाजगी अवयवाला इजा. फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. मयत बालेपीर परिसरातील अवैध दारू दुकानात काम करत होता.

शिवाजीनगर पोलीस स्टेशन बीड येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.खून,अट्रॉसिटी (एससी/ एसटी अत्याचार) कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात यावा. मुख्य आरोपी दुकान मालक आणि गुन्ह्यात सामील असलेल्या इतरांविरुद्ध कठोर कारवाई करावी.पीडित कुटुंब सकाळपासून पोलीस स्टेशनवर ठिय्या आंदोलन करत होते. आरोपींना अद्याप अटक झाली नाही.त्यांना तात्काळ अटक करावी.

उमेश हा मातंग समाजातील गरीब कुटुंबातील मजूर होता.त्याच्या पश्च्यात पत्नी आणि लहान मुलं आहेत.या हत्येमुळे मातंग,बौद्ध आणि दलित समाजात तीव्र संताप व्यक्त होत असून अनेक कार्यकर्ते आणि नेते कुटुंबीयांची भेट घेत आहेत.

बीडमध्ये तणावपूर्ण वातावरणआहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणाची पुनरावृत्ती म्हणून चर्चा होत असून सोशल मीडियावर (इन्स्टाग्राम, फेसबुक) जखमांचे फोटो आणि व्हिडिओ व्हायरल होत आहेत.

नांदेडमध्ये माकपच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालया समोर निदर्शने करून मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांना कठोर कारवाई करण्यासाठी

> **काम करत असताना उमेश याला अमानुष मारहाण करून त्याची हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना संतोष देशमुख हत्येप्रमाणे केल्याचे (दोरीने बांधून मारहाण) नातेवाईक आणि सामाजिक कार्यकर्ते म्हणत आहेत.सर्व दोषींना कठोरात कठोर शिक्षा करावी**
>
> **-कॉ.गंगाधर गायकवाड,**
> **सचिव माकप**

निवेदन पाठविण्यात आले आहे.उमेश दळवी हत्येमधील आरोपीना तात्काळ अटक करावी व दोषींवर कठोरात कठोर कारवाई करून प्रकरण जलदगती न्यायलयात चालवावे.पीडित कुटुंबाचे तातडीने पुनर्वसन करावे.अशी मागणी माकप जिल्हा कमिटी व नांदेड तालुका कमिटीच्या वतीने करण्यात आली आहे.आंदोलनाचे नेतृत्व माकप सचिव तथा जिल्हा सचिव मंडळ सदस्य कॉ.गंगाधर गायकवाड,जिल्हा कमिटी सदस्य कॉ.लता गायकवाड, कॉ.करवंदा गायकवाड,तालुका कमिटी सदस्य कॉ.जयराज गायकवाड, कॉ.श्याम सरोदे, युनिट सचिव कॉ.मंगेश वट्टेवाड, कॉ.राहुल नरवाडे, कॉ.प्रेमलाताई पतंगे, कॉ. सुभाषचंद्र गजभारे, कॉ.तुषार गायकवाड आदींनी केले.

# आमदार श्रीजयाताई यांच्या वाढदिवसानिमित्त स्वच्छता अभियान व वृक्षारोपण कार्यक्रम




**दैनिक युवक आधार**

**अर्धापूर प्रतिनिधी अरविंद पांचाळ** : भोकरविधानसभा मतदार संघाच्या लोकप्रिय आमदार श्रीजयाताई अशोकराव चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त युवा मोर्चा अर्धापूर ग्रामीण च्या वतीने तालुक्यामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

आमदार श्रीजयाताई चव्हाण यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून अर्धापूर युवा मोर्चाच्या वतीने अपारंपार देवस्थान पाटनूर येथे स्वच्छता अभियान, महाआरती व वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला.

तसेच तपोवन बुद्धभूमी लहान लोन येथे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी

भाजपा तालुका अध्यक्ष बालाजी गव्हाणे युवा मोर्चा तालुकाध्यक्ष तथा आयोजक पवन पाटील इंगोले,रामराव भालेराव,नागोराव भांगे,सरचिटणीस परमेश्वर बंडाळे, कुश भांगे, उपाध्यक्ष संभाजी पाटील शिंदे,संतोष पाटील कदम,सचिन कल्याणकर,राजू बारसे,हेमंत देशमुख,भगवान पाटील तिडके, अमोल डोंगरे,सिद्धार्थ गव्हाणे,समाधान पाटील,अरुण क्षीरसागर,प्रसेनजीत लोणे,बाबुराव क्षीरसागर,अंकुश कदम,नरोजी आढाव,मुंजाजी बारसे,मुकेश खंदारे,मंगेश इंगोले, चंद्रकांत कदम,अनिकेत कदम, मधुकरराव देशमुख,अशोक नवले, सतीश कोकाटे,आनंद शिंदे, दिगंबर बट्टलवाड ,बाबाराव कऱ्हाळे,अरविंद शिंदे, किरण शिंदे,दत्ता बोईनवाड, दत्तारामजी मेंडके यांच्या सह आदी युवा मोर्चा चे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# कारची काच फोडून रोख रक्कम चोरली


**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** कारची काच फोडून एक लाख वीस हजार रुपये आणि सही केलेला कोरा चेक चोरून नेल्याची घटना खारघर सेक्टर 13 येथे घडली. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात 25 मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.मकबूल दिनवारे हे तळोजा फेस वन येथे राहत असून त्यांनी त्यांची कार ग्लोबल इंटरनॅशनल स्कूल सेक्टर 13, खारघर येथील शाळेच्या गेट समोर रस्त्याच्या बाजूला पार्क केली होती. चोराने ड्रायव्हर सीटच्या मागील उजव्या बाजूच्या दरवाजाची काच फोडून एक लाख वीस हजार रुपये चोरले आणि चेक चोरून नेला.

# पत्रकारिता व सामाजिक क्षेत्रातील एक चालतं बोलतं विद्यापीठ म्हणजे जेष्ठ पत्रकार "संजीव भांबोरे

- दि :9 जून 2026 रोजी होत असलेल्या त्यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रमाचे केले आयोजन
- भंडारा जिल्ह्यातील पहेला या गावी सम्यक बुद्ध विहाराच्या प्रांगणामध्ये होणार हा आगळावेगळा अभिष्टचिंतन सोहळा साजरा

छत्तीसगड राज्यातील बालाघाट लोकसभा मतदारसंघाचे माजी खासदार बोधसिंग भगत, ओबीसी बहुजन महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा भंडारा -गोंदिया लोकसभा मतदारसंघाचे माजी खासदार डॉक्टर खुशाल बोपचे, दैनिक माझा मराठवाडा वर्तमानपत्राचे मुख्य संपादक तथा फुले शाहू आंबेडकर चळवळीचे अभ्यासक दशरथ सुरडकर, चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध सिने अभिनेते अश्विन कुमार बघाले, चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री चैताली भस्मे हे प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार असून यांच्या हस्ते या सोहळ्यामध्ये विविध मान्यवरांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. या पुरस्कार सोहळ्यामध्ये डॉक्टर, वकील ,पत्रकार ,सामाजिक कार्यकर्ते कलाकार, कवी ,प्रबोधनकार , अभिनय कला,उत्कृष्ट कर्मचारी/ अधिकारी/ आदींना सन्मानित करण्यात येणार आहे. संजीव भांबोरे हे विदर्भातील एक पत्रकारिता क्षेत्रातीलच नव्हे परंतु सामाजिक क्षेत्रातील एक उत्तुंग भरारी घेणार कुशल सर्वगुणसंपन्न नेतृत्व असून ते अनेक कला गुणांनी व पत्रकारितेच्या त्यांच्या निर्भीड लेखणीने प्रसिद्ध असून त्यांनी वाचकांच्या व सर्वसामान्यांच्या मनावर अधिराज्य केले आहे एक प्रखर व निर्भीड वक्ता म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांचा वाढदिवस असो किंवा सामाजिक कार्यक्रम असो त्यामध्ये ते पूर्णपणे झोकून देतात. गेल्या अनेक वर्षापासून त्यांनी विदर्भात मोठ मोठे सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन केलेले होते त्यांनी सामाजिक केलेल्या कामामधून उपेक्षित घटकांना सुद्धा या कार्यक्रमाच्या माध्यमातून एक विचारपीठ नवजीवनाचा नवा मार्ग निर्माण करून दिलेला आहे अशा या सर्व गुणसंपन्न व्यक्तिमत्व बाबत



लिहावं तेवढं कमी आहे. मागील वर्षी सुध्दा त्यांनी चिचाळ येथे शांतीवन बुद्ध विहारात त्यांचा वाढदिवस हा विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा केला होता या सोहळ्याला सुद्धा विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.दिनांक:09 जून 2026 रोजी भंडारा जिल्ह्यातील त्यांच्या स्वतःच्या गावी म्हणजेच पहेला येथे होत असलेल्या त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांनी या सामाजिक उपक्रमाचे व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे. या ध्येयवेढ्या व सामाजिक जाणीव असलेल्या पत्रकारिता क्षेत्रातील सर्व गुण संपन्न व्यक्तिमत्व जेष्ठ पत्रकार संजीव भांबोरे यांना वाढदिवसानिमित्त महाराष्ट्रभरातून त्या प्रमाणात शुभेच्छाचा वर्षाव होणार आहे.या सोहळ्याला जास्तीत जास्त महाराष्ट्रातून नवे विदर्भातून त्यांच्या चाहत्यांनी पत्रकारांनी उपस्थित रहावे अशी आवाहन आयोजकांनी केले आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना हे दोन शब्द हे समर्पित करीत आहे.

**दशरथ एन सुरडकर**
**(मुख्य संपादक )**
**दैनिक माझा मराठवाडा**
**छत्रपती संभाजी नगर**

# 33 लाखांची केली फसवणूक

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** भागीदारीत घेतलेला फ्लॅट परस्पर विकून आलेली रक्कम स्वतःच्या खात्यात घेऊन 33 लाखांची फसवणूक केल्या प्रकरणी प्रदीप धोंडीराम पाटील (राहणार खडक, उमरगा, लातूर) याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात 25 मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.यातील फिर्यादी संजय यशवंत परदेशी हे करंजाडे येथे राहत असून त्यांनी प्रदीप पाटील यांच्या भागीदारीमध्ये इमारत विकसित करण्यासाठी घेतली होती. 2023 ते 2026 पर्यंत त्यांनी भागीदारीमध्ये विकसित करण्यासाठी घेतलेल्या साई दर्शन बिल्डिंग करंजाडे या इमारतीतील फ्लॅट संजय परदेशी यांच्या परस्पर विकून आलेले 33 लाख रुपये ही भागीदार फर्मच्या नावे असलेल्या खात्यात न घेता स्वतःच्या खात्यात घेऊन संजय परदेशी यांची फसवणूक केली.

# सिगारेट पिऊ नका असे बोलल्याने केली मारहाण

**दैनिक युवक आधार**

सिगारेट पिऊ नका असे बोलल्याने आरोपीने दोघांना शिवीगाळ करत हाता बुक्क्याने मारहाण केल्याची घटना 24 मे रोजी खारघर येथे घडली. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात अनोळखी तीन इसम आणि तीन महिला विरोधात तक्रार दाखल करण्यात आली.जेहेब नाझीर कच्ची पनवेल येथे राहत असून ते त्यांच्या कुटुंबासह ऍपल मेंट या हॉटेलच्या बाहेर जेवण करत बसले होते. यावेळी विरोधक त्या ठिकाणी सिगारेट पीत होते. त्यांनी त्यांना या ठिकाणी सिगारेट पिऊ नका असे बोलले असता त्यांना राग आला आणि त्यांनी जेहेर कच्ची आणि त्यांच्या पत्नीला शिवीगाळ केली आणि जेहेब यांना हाताबुक्क्यांनी मारहाण करून बघून घेण्याची धमकी दिली.

# मायमराठी नक्षत्र प्रतिष्ठान अंतर्गत असलेल्या विदर्भ लेखिका संघटनेच्या वतीने आयोजित विदर्भस्तरीय ऑनलाईन कविसंमेलन उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका :** विदर्भाच्या अकराही जिल्ह्यातील कवयित्रींचे विदर्भस्तरीय कविसंमेलन मायमराठी नक्षत्र प्रतिष्ठानच्या अंतर्गत विदर्भ संघटनामार्फत गुगल मीट वर ऑनलाईन संपन्न झाले. वाशिम जिल्हा अध्यक्ष एड. मंगलाताई नागरे यांच्या अध्यक्षतेत संपन्न झालेल्या विदर्भस्तरीय कवी संमेलनाला अमरावती येथील सुप्रसिद्ध कवयित्री मा. शुभांगीताई इंगोले प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. २०१८ पासून निर्माण झालेल्या विदर्भ लेखिका संघटनाच्या अध्यक्ष प्रा.विजया मारोतकर यांनी या कविसंमेलनाच्या आयोजनाची धुरा समर्थ पणे सांभाळत अकराही जिल्ह्यांमधील कवयित्रींना समाविष्ट केले. वैदर्भीय लेखिकांच्या लेखनाच्या कक्षा सातत्याने वृद्धिंगत होत राहाव्या आणि त्यांचे लेखन समाजापुढे येत राहावे या प्रयासातून या ऑनलाइन कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

डॉ.उर्मिला ठाकरे , खामगाव यांनी क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांना समर्पित वंदना सादर केल्या नंतर कवी संमेलनाला सुरुवात झाली.वर्धा जिल्हा अध्यक्ष जयश्री कोटगीरवार यांच्या "आठवडी बाजार "या वऱ्हाडी कवितेने कविसंमेलनाची सुरुवात झाली झाली .ज्यामध्ये त्यांनी सर्वांना आपल्या बालपणात नेऊन ठेवले. बाजारात जाणारे बाबा आणि आठवडी बाजारातून येताना घेऊन येणारे "भातक " याची आठवण सर्वांना करून दिली. तोच सूर पकडत वाशिम कारंजा लाडच्या राधा मुरकुटे यांनी "गणगोत" ही कविता सादर केली . अमरावतीच्या

प्रभाताई आवारे यांनी "यशोगाथा" मांडली तर विजयाताई कडू यांनी "अधिक मासा" बाबतचे मनोगत व्यक्त केले. तिसरे विदर्भ लेखिका साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. उषाकिरण आत्राम

यांनी "उन्हाळा" सुरेख रचना सादर करून रण रणत्या उन्हात गारवा निर्माण केला. चंद्रपूर च्या लीना भुसारी यांनी दुःखातही सावरता येते.. अशी सुरेख साद घातली .. तर डॉ.उर्मिला ठाकरे यांनी आपली दमदार गझल सादर केली . नागपूरच्या डॉ.अंजलीताई टाकळीकर यांनी मातीचे महात्म्य सादर केले तर डॉ.शील बागडे यांनी गौतम बुद्धाला समर्पित रचना सादर केली.

"राजपुत्र गौतमही,शिंपे सुखावरी पाणी पिता हारे जिंके सत्य,ऋषी असितांची वाणी अमरावतीच्या शालिनीताई कावरे यांनी "मातीच्या माठा"चे महत्व विशद केले तर अकोल्याच्या लताताई थोरात यांनी स्त्री जीवनाचा आलेख मांडला. कारंजा लाड येथील

शारदा बंडे यांनी "शेतकऱ्याची व्यथा" व्यक्त केली तर यवतमाळच्या सुप्रिया पांडे यांनी सहजीवनात पती पत्नीच्या नात्याला" खमंग फोडणी " या कवितेतून सहजरित्या सादर करत कविसंमेलनात खसखस पिकविली. वर्धा येथील सरला कापसे यांनी "आई" कविता सादर करून सर्वांना अंतर्मुख केले तर आज माणसाने माणसाशी माणसासारखे वागणे सोडून दिलेआहे .जातीपातीचे बंधन पदोपदी छळतात.. असे अनेक विषय भाव व्यक्त करणारी.." जगताना मन मरून गेले" ही डॉ.मोनाली कोपरे , नागपूर यांची कविता सुन्न करून गेली.. अमरावतीच्या पद्मा ताई येऊल यांनी लेकीच्या पाठवणीच्या वेळी आईच्या मनाची होणारी घालमेल व्यक्त करून सर्वांनाच हळवे केले. अकोला येथील उषाताई भोपळे यांनी "कुकु"ही वऱ्हाडी कविता सादर करून बाई व तिच्या कपाळी असलेल्या कुंकवाचा रूढी परंपरांच्या जोखडात बांधलेला अन्वयार्थ व्यक्त केला. नागपूरच्या कोकिळा खोदनकर यांनी स्त्री जीवनाची गाथा मांडली तर गडचिरोलीच्या यामिनी मडावी यांनी सुद्धा जगण्याचे विविध पदर उघडले ... बुलढाणा येथून वैशाली तायडे यांनी .. वारी ही कविता मिस्कीलपणे सादर करत .समाजातील नव्हे तर घराघरातील वास्तव विशद केले.

'एका स्त्रीने मला पंढरपूरच्या वारीला जायचे आहे 'असे म्हणताच तिच्या घरामध्ये कसे वादळ उभे होते ..?:याचे मार्मिक चित्रण आपल्या रंगतदार रित्या सादर केले. गोंदियाच्या शालू कृपाले यांनी विरही कविता सादर करत सन्नाटा निर्माण केला




त्याच वेळेला उषाताई बुक्कावार , चंद्रपूर यांनी "आनंदाचे फेशियल" ही वेगळ्या धाटणीची कविता आणून सर्वांना मनमुराद हसविले ..

" कितीही करा खर्च,महागडे क्रिम वापरा

अंतरंगात नसेल शांती..तर बाह्यरूप कसे खुलणार?

आनंदाचे करा फेशियल..मस्त करा गप्पा टप्पा

बघातर करून सख्यांनो..हमखास रिझल्ट मिळतो..."

स्मिता खानाझोडे , नागपूर यांची जीवनाचा संदेश पेरणारी कविता सादर केली.. जे पेराल तेच उगवेल हा निसर्गाचा नियम आहे त्यामुळे माणसाने जगताना कशाची पेरणी केली पाहिजे याचे सुंदर दाखले देणारी अर्थपूर्ण रचना सादर करताना यवतमाळच्या कविता शिरभाते म्हणाल्या....

केली पेरणी विद्येची
ज्ञानांकुर उगवले
उच्च नीच नाही कोणी
शिक्षणाने उमगले

अमिता घाटोळ, अकोला, प्रा. अनिता धुर्वे ,गोंदिया, निशा काळे वर्धा यांनी ही सुरेख कविता सादर केल्या तर वर्धा येथील कविता बेदरकर यांनी वेगळ्या धाटणीची कविता सादर करत अनेक प्रश्नांची उत्तरे मागितली.. कारंजा लाड येथील गायत्री धर्माधिकारी यांनी "पुरुषोत्तम" ही कविता सादर केली....नयना देशमुख ,बुलढाणा यांनी आईवरची रचना सादर केली तर पद्मजा जोशी, यवतमाळ यांनी दुष्काळाचं वास्तव चित्र डोळ्यापुढे उभं केलं .. तोच सूर धरत रत्नमाला भोयर, चंद्रपूर यांनी "बळीराजाची व्यथा" मांडली. हिंगणघाटच्या मंजुषा चिटावर यांनी माणसाच्या अपेक्षांचा पाढा वाचला तर छाया राडे, वर्धा यांनी ग्रामीण वातावरणातील आमराई ,आजी-आजोबा हे वास्तव उभे केले. यवतमाळ जिल्ह्यातील शेंबाळपिंपरी या लहानश्या गावातून आमच्याशी जोडल्या गेल्या होत्या सविता देशमुख... यांच्याकडे व्यवस्थित नेटवर्क नव्हते .भर उन्हात घरावर उभे राहून त्यांनी "महागाईचा भूकंप " ही कविता पूर्ण ताकदीने सादर केली.. त्यांचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे.या कवितेतून जगतानाचा आक्रोश मांडताना त्या म्हणतात...

"काय खावं काय ल्यावं
कळेनासं झालं मला
महागाईच्या भूकंपाने
जीव माझा हादरला..."

जगताना असे चटके मिळत असताना... कविता दाते ,वर्धा ह्या भर उन्हातही मनात आल्हाद फुलवणारी "पळस" ही रचना घेऊन आल्या... रणरणत्या रानात उन्हात फुलणाऱ्या पळसाचे मनभावन अंतरंग उलगडले.. नागपूरच्या डॉ.पद्मिनी दुरूगकर यांनी "झुरळ पार्टी" वरची कविता सादर करून वास्तवाचे भान दिले. डॉ. सविता बेदरकर, गोंदिया यांनी हिंदी रचना सादर केली .जग स्त्रीला अनेक प्रश्न विचारत असत ... परंतु तिच्या प्रश्नाचे उत्तर व्हायला कोणी का तयार नसत..? असा व्यवस्थेला जाब विचारणारी जबरदस्त हिंदी रचना सादर केली.

यवतमाळ जिल्हा अध्यक्ष निशा डांगे यांनी आपल्या बाबांच्या आठवणीत" दूर उडाली पाखरे" ही भावविभोर कविता सादर केली तर.डॉ साधना काळबांडे, अकोला यांनी स्त्री सुरक्षेचा ऐरणीवर असलेला प्रश्न सावित्रीमाई समोर मांडताना "साऊ"

या कवितेत म्हटले ..की..

"काय अन कस...तुला साऊ ग सांगू

एकाच पाटीवर जीवनाची..व्यथा कशी मांडू"

म्हणत सर्वांचे लक्ष आपल्याकडे वेधले.

चंद्रपूरच्यासंध्या वीरमलकर यांनी "रस्ता" यावरील आपली कविता सादर करून एकच वळण चुकलं तर जगणं कसं सैरभैर होत. याची कल्पना उभी केली .कोकिळा खोदनकर, नागपूर यांच्या कवितेने सर्वांना बांधून ठेवले.

अमरावतीच्या विजया भांगे यांनी आपली दर्जेदार रचना सादर केली. सुनिता तायडे यांनी लग्नांमध्ये आयोजित करण्यात आलेली बुफे पद्धती सुरेख रित्या कवितेतून मांडून जुनं ते सोनं म्हणायला भाग पाडलं तर प्रणोती कळमकर यांनी एकूणच आयोजनाचे आणि विजया मारोतकरांचे कौतुक करणारी कविता सादर केली. कार्यक्रमाच्या आयोजक प्रा.विजया मारोतकर यांनी सर्वांना धक्का देणारीच कविता सादर केली.

मी माझ्या प्रियकरा बद्दलची कविता सादर करत आहे . लक्षपूर्वक ऐका ... हा प्रियकर कोण..? हे तुम्हाला शेवटच्या कडव्याच्या शेवटच्या ओळीत कळेल ..असे म्हणाल्या... त्यामुळे अधीरतेने सर्वांनी जीवाचे कान करून ऐकले ..हा प्रियकर कोण ..? या प्रतीक्षेत असतानाच शेवटच्या क्षणात हा प्रियकर म्हणजे "अक्षर" होय हे सिद्ध झाले.

अक्षरांना समर्पित कवितेच्या शेवटी रहस्य उलगडताना त्या म्हणाल्या...

कधी एकांत.. कधी आकांत झेलत

लेखणीतून माझ्या उतरवलीस विराणी

तरी रे प्रत्येक वेळी..' अक्षरा '

गुलजार केलीस माझी कहाणी

सर्वांना हलकासा झटका मिळाला .विदर्भ स्तरीय रंगलेल्या या भव्य काव्य संमेलनाला उपस्थित असलेल्या प्रमुख अतिथि अमरावतीच्या शुभांगीताई इंगोले यांनी आयोजनाचे तसेच सर्वांच्या कवितांचे खूप खूप कौतुक करत सर्व विदर्भ लेखिकांना समर्पित असे ....

" जीवनाच्या वाटेवर साथ तुमचीच आहे...

तुम्ही नसत्या तर ही जागा रिक्त राहे"

असे काव्य सादर करत..सारे श्रेय विदर्भ लेखिकांना दिले.. आणि प्रमुख अतिथी पद दिल्याबद्दल आभार मानले.स्वतः सर्व गुणसंपन्न ..उच्चविद्याविभूषित असताना त्यांचे अशा प्रकारे नम्रपणे व्यक्त होणे ...सर्वांना खूप भावले..

सर्वात शेवटी कवी संमेलनाच्या अध्यक्ष एड.मंगलाताई नागरे यांनी कवी संमेलनात सादर झालेल्या एकापेक्षा एक दर्जेदार कवितांचा आढावा घेत अल्पावधीत इतके भव्य दिव्य कविसंमेलन विदर्भ स्तरीय पातळीवर उभे करून सर्वांना आश्चर्याचा धक्का देणाऱ्या विजया मारोतकारांचे

कौतुक केले .. विदर्भातील शेकडो लेखिकांना एका रेशीम बंधात बांधून ठेवण्याची किमया विदर्भ लेखिका संघटनामार्फत होत आहे . या सातत्याला मला प्रणाम करावासा वाटतो. कितीही अडचणी आल्या तरी विजयाताई थांबत नाही आणि आपल्या सोबत मागे पडलेल्या कानाकोपऱ्यातल्या वैदर्भीय लेखिकांना पुढे आणण्यासाठी कायम धडपडत असतात ...त्यांच्या या धडपडीला पाहून आम्ही सतत त्यांच्या सोबत असतो..

आणि राहणार.. तुम्ही पण राहा असा संदेश देत

सर्वांच्या कवितांची दखल घेतली आणि

आपली" ऋण" ही कविता सादर केली

" दूर शहरी तुझ्या जीवनी
दंग आपल्या सुखात आहे
बघ गावाकडे रे जाऊनी
अजून सारे तसेच आहे"

खेड्याकडे पाठ करून शहरात सुखी संपन्न जीवन जगणाऱ्या समाजातील कितीतरी लोकांना चपराक देणारी त्यांची कविता ठरली.बाहेर तप्त उन्हाळा असताना आपल्या घरी थंड हवेत बसून एकापेक्षा एक दर्जेदार कवितेचा आनंद देणाऱ्या या कवी संमेलनातील सर्व कवयित्रींच्या सादरीकरणाने एक वेगळाच आनंद प्राप्त झाला. या देखण्या कवी संमेलनाचे नेटके आणि दर्जेदार असे सूत्रसंचालन प्रणिती कळमकर ,नागपूर आणि सुनीता तायडे ,अमरावती यांनी केले ..तर आभार प्रदर्शन विजया भांगे, अमरावती यांनी केले ...नागपूर, वर्धा, यवतमाळ, अमरावती ,अकोला ,भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर , बुलढाणा, आणि वाशिम अशा विदर्भाच्या 11 ही जिल्ह्यांमधून सहभाग असलेल्या 63 कवयित्रींच्या सहभागाने विदर्भ स्तरीय ऑनलाईन कवी संमेलन नितांत उत्साहात संपन्न झाले.

जीवनाचे सारेच भाव या विविध अंगी कवितांमधून साकारल्या गेले. जीवनाचे वास्तव ,व्यथा ,वेदना यांचा आलेख मांडणाऱ्या कवितांसह अनेक प्रश्नांची उत्तर देणारी काव्य कधी गंभीर करून गेले तर त्या गंभीर झालेल्या वातावरणात खसखस पिकविणाऱ्या विनोदी कवितांनी कविसंमेलन सातत्याने उंचीवर नेले. विदर्भस्तरीय ऑनलाईन कविसंमेलन यशस्वी झाल्याचे समाधान सर्वांनाच लाभले.

# मोदी खरे धुरंदर, त्यांच्यावर टीका करणारे दलिंदर

**दैनिक युवक आधार**

**मुंबई ( प्रतिनिधी ) :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या बारा वर्षांत देशाचे यशस्वीपणे नेतृत्व करत भारताला विकास, आत्मनिर्भरता आणि जागतिक प्रतिष्ठेच्या नव्या उंचीवर नेले आहे. त्यामुळे मोदी हे खरे “धुरंदर” असून त्यांच्यावर टीका करणारेच खऱ्या अर्थाने “दलिंदर” आहेत, अशी खरबरीत आणि आक्रमक टीका उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ आणि विरोधकांवर केली. मुंबई येथे पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी मोदींवरील टीकेचा तीव्र शब्दांत समाचार घेतला.

शिंदे म्हणाले,“देशहिताला सर्वोच्च प्राधान्य देणारे नरेंद्र मोदी हे आज जगातील सर्वाधिक लोकप्रिय नेत्यांपैकी एक आहेत.

गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून १३ वर्षे आणि देशाचे पंतप्रधान म्हणून १२ वर्षे त्यांनी जनतेचा विश्वास संपादन केला आहे. भारताला महासत्तेकडे नेण्याचे, आत्मनिर्भर भारत उभारण्याचे आणि देशाची अर्थव्यवस्था मजबूत करण्याचे ऐतिहासिक कार्य मोदीजींनी केले आहे.”

विरोधकांवर निशाणा साधताना त्यांनी म्हटले की, “ज्यांनी आयुष्यात देशासाठी कोणतेही भरीव योगदान दिले नाही, ते आज मोदीजींवर टीका करत आहेत. ‘कहाँ राजा भोज और कहाँ गंगू तेली’ अशीच त्यांची अवस्था आहे. मोदीजींवर आरोप करणे म्हणजे सूर्यावर थुंकण्याचा प्रकार आहे. अशा टीकांमुळे मोदींची प्रतिमा कमी होणार नाही, उलट विरोधकांची राजकीय दिवाळखोरीच उघड होत आहे.”

“मोदीजींनी देशाला भ्रष्टाचारमुक्त आणि

**हर्षवर्धन सकपाळ यांच्या मोदीवरील टीकेला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे प्रत्युत्तर**



निर्णयक्षम नेतृत्व दिले. संरक्षण क्षेत्रात भारताला आयातदारातून निर्यातदार बनवले. पायाभूत सुविधा, डिजिटल क्रांती, परराष्ट्र धोरण आणि आर्थिक सुधारणांमुळे भारताची जागतिक पातळीवरील ताकद वाढली आहे. बारा वर्षांच्या कार्यकाळात मोदीजींवर भ्रष्टाचाराचा एकही डाग लावता आलेला नाही. हीच त्यांच्या नेतृत्वाची सर्वात मोठी पावती आहे, असेही शिंदे म्हणाले.

काँग्रेस नेत्यांच्या वक्तव्यांचा समाचार घेताना त्यांनी स्पष्ट केले की, "देशाच्या पंतप्रधानांवर खालच्या दर्जाची भाषा वापरणे ही भारतीय संस्कृती नाही. राजकीय विरोध असू शकतो, पण वैयक्तिक पातळीवर घसरून केलेली टीका जनता कधीही सहन करणार नाही. १४० कोटी भारतीय मोदीजींच्या कामगिरीचे साक्षीदार आहेत आणि योग्य वेळी विरोधकांना उत्तर देतील.”

# हिमालयाची सावली; त्यागमूर्ती माता रमाई

आज २७ मे, भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी रमाई यांची पुण्यतिथी. ७ फेब्रुवारी १८९७ रोजी माता रमाई यांचा जन्म एका गरीब कुटूंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भिकू धोत्रे ( वलंगकर ) तर आईचे नाव रुक्मिणी असे होते. दाभोळजवळील वनंदगावात नदीकाठी महारपुरा वस्तीमध्ये त्या राहत होत्या. त्यांना तीन बहिणी व एक भाऊ होता. त्यांचे वडील दाभोळ बंदरात माशांनी भरलेल्या टोपल्या पोहचवत असत. रमाई लहान असतानाच त्यांच्या आईचे निधन झाले. काही दिवसांनी वडिलांचेही निधन झाले. लहान वयातच आई वडिलांचे छत्र हरपल्याने कोवळ्या रमाईच्या मनावर मोठा आघात झाला. आई वडिलांविना पोरक्या झालेल्या या भावंडांना वलंगकर काका व गोविंदपूरकर मामा यांनी मुंबईला आणले. मुंबईतील भायखळा मार्केटच्या चाळीत ते राहू लागले. त्याच सुमारास सुभेदार रामजी आंबेडकर हे आपल्या भीमरावसाठी मुलगी पाहत होते. वलंगकारांकडे लग्नाची मुलगी असल्याचे त्यांना समजले. सुभेदार रामजी आंबेडकर यांनी रमाईला



पाहिले. रमाईला पाहता क्षणिच सुभेदाराने तिला आपल्या भीमरावासाठी पसंत केली. रमाई आणि भीमराव यांचा भायखळ्याच्या मार्केटमध्ये विवाह झाला. विवाहाप्रसंगी बाबासाहेबांचे वय चौदा तर रमाईचे वय नऊ वर्ष होत. त्यावेळी बाल विवाहाची प्रथा समाजात रूढ होती. लग्नात पंच पक्वान्ने नव्हती. झगमग रोषणाई नव्हती. अतिशय साध्या पद्धतीने हा विवाह पार पडला. माता रमाईला जीवनात अनेक दुःखे सहन करावी लागली. १९२३ साली बाबासाहेब लंडनला गेले. त्यावेळी रमाईची खुप वाताहत झाली. ती दुष्काळाच्या आगीत होरपळत होती. बाबासाहेबांच्या कार्यकर्त्यांना त्यांचे हाल पहावले नाही त्यांनी काही पैसे जमा केले व ते पैसे रमाईला देऊ केले. त्यांनी कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर केला मात्र पैसे स्वीकारण्यास नम्रपणे नकार दिला. रमाई या बाबासाहेबांप्रमाणेच स्वाभिमानी होत्या. माता रमाई या आयुष्यभर दुःखाशी, गरीबीशी जिद्दीने झगडत होत्या मात्र हार मानत नव्हत्या. मृत्यूसत्र, दुःख, त्याग, समजूतदारपणा , कारुण्य, उदंड मानवता आणि मृत्यू यांचे सर्जनशील ज्वलंत प्रेरणास्थान म्हणजे माता रमाई. रमाईने अनेक दुःखे झेलली. त्यांच्या इतके मरण कोणीही पाहिले नसेल. लहान वयातच आई वडिलांचा मृत्यू, १९१३ साली सासरे शुभेदार रामजी आंबेडकर यांचा मृत्यू, बाबासाहेबांचे मोठे बंधू आनंदराव, त्यांचा मुलगा गंगाधर यांचा मृत्यू, १९२१ साली बाबासाहेबांचा मुलगा बाळ गंगाधर, १९२६ मध्ये राजरत्न असे अनेक मृत्यू त्यांनी पाहिले पण त्या डगमगल्या नाहीत. पती बाबासाहेब आंबेडकर परदेशात शिकायला गेल्यावर त्या एकट्या घर चालवत होत्या. घर चालवण्यासाठी तिने शेण गोवऱ्या वेचल्या. बॅरिस्टर पतीची पत्नी शेण गोवऱ्या गोळा करते असे लोक नावे ठेवतील म्हणून त्या पहाटे लवकर उठून शेण गोवऱ्या गोळा करत. आयुष्यभर काबाड कष्ट करून त्यांचे शरीर पोखरून गेले होते. त्यामुळे त्या आजारी पडल्या. जानेवारी १९३५ पासून आजार वाढत गेला. मे १९३५ ला त्यांचा आजार विकोपाला गेला. बाबासाहेबांनी सर्व नामांकित डॉक्टरांना पाचारण केले. मात्र त्यांचे शरीर औषधोपचारांना प्रतिसाद देत नव्हते. बाबासाहेब त्यांना फळांचा ज्यूस, चहा, कॉफी पाजत. मात्र त्यांच्या तब्येतीत सुधारणा होत नव्हती. अखेर २७ मे १९३५ रोजी रमाईची प्राणज्योत मावळली. सर्व परिसर आकांतात बुडाले.

बाबासाहेबांना हे दुःख पचवणे अवघड गेले. ते रमाईच्या पार्थिवाशेजारी बसून ढसाढसा रडले. जवळ जवळ तीस वर्षे हिमालयासारख्या महामानवाला धैर्याने व प्रेमाने साथ देणारी हिमालयाची सावली सोडून गेल्याने बाबासाहेब एकाकी पडले. हिमालयाची सावली बनलेल्या त्यागमूर्ती माता रमाई यांना पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन!



श्याम ठाणेदार